# माणूस

शनिवार । २३ जून १९७९ । ७५ पैसे


# पुणेकर मतदारांनी काय सांगितले ? काय सूचित केले ?

जनता पक्षावर पुणे महानगरपालिका निवडणुकीत शाहिस्तेखान होण्याचा प्रसंग गुदरावा, हे अगदीच अनपेक्षित घडले असे म्हणता येणार नाही. जीवावर बेतले होते; पण बोटावर निभावले. जनता पक्ष बऱ्यापैकी निवडून आला; अध्यक्ष मात्र पक्षाला गमवावा लागला. याची कारणे अनेक आहेत. अध्यक्ष अण्णा जोशी यांच्याविरुद्ध सर्व शक्ती एकवटल्या हे प्रमुख कारण. नवीन रक्ताची, तरुण चेहऱ्यांची मतदारांची मागणी हे आणखी एक कारण. शिवाय अण्णा जोशी यांचे अलिकडे आपल्या मतदारसंघाकडे झालेले दुर्लक्ष, कार्यकर्त्यांमधील नाराजी हीही कारणे आहेतच. जनता आणि समांतर काँग्रेस युती नसती तर मिळाले इतकेही यश केवळ जनता पक्षाला मिळाले नसते, हेही उघड आहे. जनता पक्षाला ग्रामीण भागात प्रवेश नाही हे गेल्या महिन्यात झालेल्या जिल्हा परिषद निवडणुकांनी दाखवून दिलेले आहे; पण मुंबई-पुणे हे जनता पक्षाचे किल्ले तरी सुरक्षित आहेत ही समजूत होती. याही समजुतीला चांगलाच तडाखा बसलेला आहे. दिल्लीतील वरिष्ठ नेत्यांच्या भांडणांकडे लक्ष देऊ नका असे कुणी कितीही आळवून आळवून सांगितले तरी या भांडणांमुळे पक्षाची प्रतिमा बिघडायची ती बिघडतेच. या भांडणामुळे जनता पक्ष फुटणार असे आता रस्त्यावरील साधा नागरिकही म्हणू लागलेला आहे. शिवाय समजा दिल्लीतील भांडणांकडे दुर्लक्ष करायचे ठरवले, तरी मुंबईत काय उजेड आहे ? जनता पक्ष सत्तेत सहभागी झाला; पण सत्तेवर गेल्या वर्षभरात या पक्षाला कसलीही पकड बसवता आलेली नाही. इतरच घटक मलिदा खाऊन पुष्ट होताहेत आणि जनता पक्षाला ओझ्याचे बैल यापेक्षा अधिक किंमत नाही, अशी भावना सर्वसामान्यांमध्येही बळावत आहे. कार्यक्षमतेच्या नावाने तर भलेमोठे पूज्यच द्यावे लागत आहे. अशा स्थितीत पुणेकर मतदारांनी टाकला एवढा विश्वासही तसे पाहिले असता खूपच समजावा लागेल. दोन वर्षांपूर्वी मुंबई-पुणे हे जनता पक्षाचे बालेकिल्ले होते. आता केवळ किल्ले उरलेले आहेत आणि या किल्ल्यांचेही अनेक बुरूज ढासळताहेत, भगदाडे मोठी होताहेत, फंदफितुरीचे प्रमाणही वाढत आहे. हा किल्ला अशा स्थितीत ८२ सालापर्यंत तरी टिकून राहतो की नाही, हीच मुळी जिथे शंका वाटू लागलेली आहे, तिथे मिळाला तेवढा विजय अगदी अनपेक्षित होता, असे कसे म्हणता येईल ? एवढा विजय तरी पदरात टाकल्याबद्दल जनता पक्षाने वास्तविक मतदारांचे आभारच मानले पाहिजेत. अध्यक्ष गमावला, पक्ष बराचसा सहीसलामत सुटला. पुढच्या खेपेस मात्र हेही भाग्य राहील की नाही याची खात्री नाही. जनता पक्षातले मुख्य घटक दोन. समाजवादी आणि जनसंघ. यातील बहुतेक सर्व समाजवादी उमेदवारांचा धुव्वा उडाला. अण्णा जोशी सोडले तर जनता पक्षातील पूर्वाश्रमीच्या जनसंघाने मात्र आपले पूर्वीचे स्थान टिकवून धरले आहे; पण स्थान फक्त टिकवून धरले एवढेच समाधान फार तर या पूर्वाश्रमीच्या जनसंघ घटकाला मानता येईल. कारण या स्थानांनाही जोराचे धक्के बसलेलेच आहेत. टायपिंगमध्ये ओळ संपण्यापूर्वी वॉर्निंग बेल वाजते. तशी वॉर्निंग बेल या निवडणुकीमुळे वाजलेली

आहे हे जनता पक्षाने, त्यातील घटकांनी ओळखले पाहिजे. नवीन ओळीसाठी कागद पुढे सरकवायला हवा. अशी नवी ओळ सुरू झाली नाही, कागद पुढे सरकलाच नाही तर ८२ साल कठीण आहे, हे सांगायला आता ज्योतिषाची काही गरजच नाही. भिंतीवर हे भवितव्य लिहिलेले आज कुणीही वाचू शकतो.

८२ सालानंतर कोण हेही पुणेकर मतदारांनी सूचित करून ठेवलेले आहे. म्हातारे नकोत हे तर स्पष्टच सांगितले. आणखी काय सांगितले ? आणखी असे सांगितले की, एकाधिकारशाहीविरुद्ध लढा वगैरे जो बकवास जनता + समांतर काँग्रेस युतीने चालवलेला आहे, त्यावर पुणेकरांचा मुळीच विश्वास नाही. सत्तेसाठी आणि केवळ सत्तेसाठीच ही मंडळी एकत्र आलेली आहेत आणि सत्ताही यांना धडपणे राबवता येत नाही, असे सर्वसामान्य मतदाराला जाणवत आहे. एस्. एम्. जोशींसारख्या त्यागमूर्तींनी कितीही भलावण केली, मुंबईतील बड्या वृत्तपत्रांनी कसेही गोडवे गायले तरी या युतीप्रयोगाला कुठलेही तात्त्विक अधिष्ठान अजूनपर्यंत तरी लाभू शकलेले नाही. युतीनंतर कमी होण्याऐवजी एकाधिकारशाहीचा इंदिरा काँग्रेसचा धोका वाढतोच आहे ! जिल्हा परिषदांच्या निवडणुकात हेच दिसून आले. मुंबई-पुण्यात हे लोण पोचलेले नसेल अशी कालपरवापर्यंत समजूत होती; पण तीही पुण्याच्या निवडणुक निकालांनी चुकीची ठरवलेली आहे. जिल्हा परिषद निवडणुकातील इंदिरा काँग्रेसचा विजय मुख्यमंत्री शरद पवारांना अनपेक्षित वाटला. पुणे महानगरपालिका निवडणुकीतील इंदिरा काँग्रेसचे यश गृहराज्यमंत्री भाई वैद्य यांना केवळ अनपेक्षितच नाही, आश्चर्यजनकही वाटले. वास्तविक हे इतके अनपेक्षित व आश्चर्यजनक असायचे कारण नव्हते. झोपडपट्ट्यातून इंदिरा गांधींचे आकर्षण कुणालाही जाणवण्याइतके उघड दिसत होते. झोपडपट्ट्यातूनच कशाला ? शेवटी जनता पक्षाच्या अध्यक्षांना कुणी पाडले ? नागरिक संघटना हे केवळ वरचे लेबल आहे. गाजराची पुंगी म्हणून आजवर ती सगळ्यांनीच गरज होती तेव्हा वाजवली. वेळ येताच मोडून खाल्ली. असंतुष्ट समाजवादी, इंदिरा काँग्रेस आणि थोरातांची मंडई या सर्व शक्ती एकत्र आल्या आणि जनता पक्षाध्यक्ष अण्णा जोशी यांचा पराभव त्यांनी मोठ्या निकराने घडवून आणला. यात मोठा नसला तरी बरोबरीचा वाटा इंदिरा काँग्रेसने उचललेला आहे, हे नाकारून कसे चालेल ? असंतुष्ट समाजवाद्यांनी इंदिरा काँग्रेसशी हातमिळवणी करावी आणि जनता + समांतर काँग्रेस युतीचे असे नाक कापावे, तिला अपशकुन करावा, हे जरा विचित्रच दृश्य आहे; पण कुणी सांगावे, ८२ साली काय घडणार याची ही नांदीही असू शकेल. जनता पक्षाला किंवा जनता + काँग्रेस + समाजवादी युतीला एकमेव पर्याय म्हणून इंदिरा काँग्रेस पक्ष पुढे येत आहे आणि जनता पक्षाशी जवळून किंवा लांबून, चोरटी किंवा उघड अशी कुठलीही हातमिळवणी करणाऱ्या शक्तीला, व्यक्तीला निर्धारपूर्वक लांब ठेवून आपली जनतापक्षविरोधी प्रतिमा धारदार आणि कडवी करण्याचा इंदिरा गांधींचा प्रयत्न यशस्वी ठरत आहे, हे पुण्यातील निवडणुकांनी पुरेसे स्पष्ट केलेले आहे. जनता म्हणजे जनसंघ आणि जनसंघ म्हणजे संघ असे समीकरण पक्के होत गेले, तर ही अप्रत्यक्षपणे इंदिरा गांधींना मदतच ठरणार आहे. हे समीकरण खोटे ठरवणे आता जनता पक्षाच्या घटकांवरच अवलंबून आहे. एकटे समाजवादी, एकटे जनसंघवादी अलग अलग नामोहरम ठरतील. आपले पूर्वग्रह वगैरे बाजूस ठेवून, पक्षजाहीरनाम्यातील आश्वासनांची पूर्ती करण्याचा अजूनही प्रयत्न झाला तर वेळ गेलेली नाही. युतीपेक्षा लोकांना प्रत्यक्ष कृती हवी आहे. मग ती सत्तेत सहभागी होऊन करा नाही तर सत्तेबाहेर राहून करा. या कृतीच्या अभावामुळे लोक पर्यायांच्या शोधात राहतात आणि हा पर्याय कोणता असेल ? पुणे महानगरपालिका निवडणुकांनी एक पर्याय सूचित करून ठेवलेला आहे. तो नको असेल तर ठोस कृती हवी. गप्पा पुरे झाल्या. □


**साप्ताहिक माणूस**

वर्ष : एकोणिसावे
अंक : चौथा
२३ जून १९७९
किंमत : ७५ पैसे

संपादक
**श्री. ग. माजगावकर**

साहाय्यक
**दिलीप माजगावकर**
**सौ. निर्मला पुरंदरे**

वार्षिक वर्गणी :
**चाळीस रुपये**



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४ ३४५९

संध्याकाळचे पुणे । दि. बा. मोकाशी

# लोकशाही देवीचा उत्सव

हा लेख प्रसिद्ध होईपर्यंत पुणे महानगरपालिकेच्या निवडणुकांचे निकाल लागले असतील.

दर पाच वर्षांनी येणारा जणू हा लोकशाही देवीचा उत्सवच. उमेदवारांच्या जागोजागच्या कचेऱ्या ही देवी बसण्याची ठिकाणे. साधारण पंधरा दिवसांपूर्वी हा उत्सव सुरू झाला. जागोजागी रंगीत पताका लागल्या, झेंडे उभारले, मोठमोठे कापडी फ़लक रस्त्यावर उंच आडवे टांगले गेले. घोषणांची नवी नवी काव्ये रचली जाऊ लागली. पाच-पंचवीस तरुण पोरं उमेदवारांच्या कचेऱ्यांत धावपळ करताना दिसू लागली. पत्रके वाटली जाऊ लागली, मतदारांच्या स्लिपा लिहून तयार होऊ लागल्या. रिक्षा, उमेदवारांचे फलक, पताका आणि स्पीकर लावून सज्ज होऊन 'तुमच्या लाडक्या उमेदवारालाच मत द्या' आरडत हिंडू लागल्या. लहान मुलांचे घोळके या कचेऱ्यांभावती आनंदाने बागडू लागले. प्रचाराची रिक्षा कचेरीशी विसाव्यास थांबताच मुले रिक्षात चढून माइक समोर ओरडत उमेदवाराचा जयजयकार करू लागली. ज्यांच्या हाती स्वयंसेवकांचे बिल्ले लागले ते छातीवर लावून ती दिमाखाने मिरवू लागली. आम्ही शाळेच्या गणपती उत्सवात जसे रात्री समोरच जाजमावर झोपत असू तसे कार्यकर्ते इथेही निवडणूक कचेऱ्यांतून झोपत होते. पुढे गणपती गेल्यावर दोन दिवस आम्हाला सुनं सुनं वाटायचं. तसं निवडणूक संपताच या मुलांना रिते रिते वाटेल हे मनात येऊन मला त्यांच्यासाठी उदासही वाटले.

या लोकशाही देवीच्या उत्सवात काही लाखांची उलाढाल झाली. हा आनंदच. निवडणूक नसती तर हे पैसे खर्च झाले नसते आणि असंख्य लोकांना कामे मिळाली ती मिळाली नसती. व्यवसायांना तर्जा आली, ती आली नसती. छपाई, फलक, रिक्षा, स्पीकर, मांडव, उपहारगृहे अशा अनेक धंद्यांना प्रोत्साहन लाभले. या वेळी निवडणुकांच्या मिरवणुकांतून स्त्रियांनीही नाचून घेतले, हे एक या वेळचे वैशिष्ट्य. आता लवकरच, 'भिंतींवर लिहिलेला मजकूर उमेदवार पुसत नाहीत, चिकटवलेली पत्रके काढीत नाहीत' अशा तक्रारींची पत्रे घरवाले नागरिक, वर्तमानपत्राकडे धाडतील आणि शेवटी स्वतःच भींती साफ करावयास निघतील तेव्हा निवडणुकीचे वातावरण सर्व अर्थाने संपेल.

वर्षामागून वर्षे जशा निवडणुकी होत आहेत तसतशा दोन गोष्टी लक्षात येत आहेत. एक, वक्तृत्वाच्या कलेला ओहोटी लागली आहे आणि दुसरे निवडणूक लढविण्याचा खर्च वाढत आहे. कुणी म्हणतील, बीभत्सपणा वाढला आहे, ही तिसरी गोष्ट लक्षात घ्यावी; पण बीभत्सरस सर्वच क्षेत्रात वाढला आहे. या रसाची आवड सर्वत्र का वाढावी हा एक निराळाच सामाजिक अभ्यास होईल. आता वक्तृत्वाला ओहोटी लागण्याचं कारण अभ्यासाचा अभाव हे उघड आहे. अगदी गोटया तोंडात धरून सिसरोसारखा बोलण्याचा सराव करावा असं कुणी सांगणार नाही. शिवाय ज्या समुद्रावर सिसरो हा सराव करावयाचा, तो समुद्र पुण्याला कसा आणणार? पण वक्तृत्वासाठी आमचे शिक्षक आम्हाला 'रोमन्स अँड सिटिझन्स' हा उतारा पाठ करावयाचा सल्ला द्यावयाचे, शि. म. परांजप्यांची व्याख्याने पाठ करण्यास सांगावयाचे. असं काही तरी काही काळ आपल्या लोकांनी करायला हवं. वक्तृत्व आणि अभ्यास हे नसल्यामुळे दारोदार हिंडण्याचे नवे तंत्र उमेदवारांनी काढलंय. मतदाराच्या दाराशी 'अलक निरंजन' म्हणावं तस, 'तुमचा आशीर्वाद हवाय' एवढं एक वाक्य बोललं की पुरे होतं.

असं ऐकतो की हल्ली प्रत्येक उमेदवारास महानगरपालिकेच्या निवडणुकीचा खर्च साधारण वीस एक हजार रुपये येतो. हा आकडा ऐकण्यावर, कलियुगात सत्ययुगाची आठवण देणारी एक पूर्वीची निवडणूक आठवली. मुंबईजवळ कल्याण म्हणून एक गाव आहे. तेथे घारपुरे नावाचे एक गृहस्थ गरिबीत दिवस काढीत राहत होते. त्यांना मुंबईत नोकरी होती. कल्याणहून रोज ते मुंबईस जात. हे गृहस्थ भयंकर तत्वाचे होते. मी भयंकर म्हटलं याचं कारण त्यांची जाज्वल्य तत्वनिष्ठा लोकांना भयंकर वाटावयाची. दरवर्षी ते म्युनिसिपल निवडणुकीसाठी उभे राहत व दरवर्षी भयंकर बहुमताने निवडून येत. मला वाटते ते असे सहा वेळा निवडून आले. निवडणुकीला उभे राहण्याची त्यांची तऱ्हा न्यारी होती. त्यांच्या वॉर्डात जेवढे मतदार होते तेवढी पोष्ट कार्डे ते विकत घेत. ही पोष्ट कार्डे विकत घेण्यास त्यांचे मित्र एक एक रुपया काढून पैसे देत. त्या वेळेस पंचवीस एक रुपयांची कार्डे भरपूर होत. ही कार्डे लिहिण्यास मित्रांची मुले येत. निवडणुकीचा हा एवढाच त्यांचा खर्च. पंचवीस रुपये. त्या कार्डांवर खालील चार ओळी असत–

'सप्रेम नमस्कार

'तुम्ही मला निवडून दिल्यास मी सत्ताधारी पार्टीस मिळणार नाही असे वचन देतो. सतत विरोधी पार्टीच्या बाकावर बसून सत्तेवरची पार्टी योग्य कारभार करत आहे की नाही इकडे मी लक्ष ठेवीन.

'माझ्याजवळ पैसा नाही. त्यामुळे तुम्हांस मतदानकेंद्रावर नेण्यास मला टांगा धाडता येणार नाही. तसेच मला स्वतःलाही तुम्हांस 'मत द्या' असं सांगता येणार नाही. कारण मला मुंबईस नोकरीला जावं लागतं. तसेच पैशाभावी आणखी पत्रही तुम्हाला धाडता येणार नाही. मतदानाच्या दिवशीही गावात राहावयाचे नाही ही माझी पोरपाठ आहे. मी मुंबईस नोकरीवर जाईन. कारण मी माझे काम चोख केलं तरच तुमचं काम मी चोख करीन असा विश्वास तुम्हाला येईल. तुमचे मत मला मिळेल असं मी धरून चालतो.

आपला, नम्र इत्यादी.'

एवढे एक पत्र मतदारास धाडून हे गृहस्थ मतदानाच्या दिवशी खरोखरच मुंबईस निघून जात आणि हमखास निवडून येत. त्यांच्याविरुद्ध असलेला उमेदवार शेकडो रुपये खर्च करून पडत असे.

दर वेळी निवडणुकीच्या प्रचाराचो माणसं मत मागायला घरी येऊ लागली की, एक नैतिक प्रश्न माझ्यापुढे उभा राहतो, 'मतदारांच्या यादीत माझे नाव आहे खरं; पण मी पुण्याचा आहे का?' हा प्रश्न चमत्कारिक वाटेल. कायद्याप्रमाणे मी पुण्याचा नागरिक आहे. मताचा मला अधिकार आहे. सर्व ठीक आहे; पण मी पुण्याचा झालो आहे का? मी येथे पंचवीस वर्षे आहे. माझे पोट इथे भरतो आहे; पण मी पुण्याचा

आहे का? माझा संसार मी इथं थाटला आहे. मुलंबाळं इथं शिकताहेत; पण मनापासून मी पुण्याचा आहे का?

हा प्रश्न मी कसलेल्या व्याख्यात्याने मांडावा तसा पल्लेदार मांडला आहे. माझे या प्रश्नाचे उत्तर, 'मी या नगरीचा नाही' हे आहे. हेच उत्तर मोठ्या शहरातील असंख्य नागरिकांनी द्यायला हवे; पण ते सारखे म्हणत राहतील, 'मी या शहराचा आहे—मी पुण्याचा आहे.' अर्थात ते खोटे आहे. माझ्याप्रमाणे जे बाहेरून शहरात आले त्यांना आपले मूळ गाव कधीही विसरता येणार नाही. एवढंच कशाला? आमची मुलं जरी कधी गावी गेली नाहीत तरी नाना तऱ्हेने आम्ही गावाकडच्या गोष्टी सांगत राहू किंवा गाववाल्यांची संमेलने भरवून गावाचा ठसा पुसू देणार नाही. वाई गाव ज्यांचे आहे त्यांचे संमेलन, कोल्हापूर गाव आहे त्यांचे संमेलन, पंढरपूर गाव आहे त्यांचे संमेलन इत्यादी.

म्हणूनच मला नेहमी वाटते की, शहरात राहणारा नागरिक हा मनाने शहरात रहातच नसतो. मनाने तो आपल्या गावी असतो. मग तो इथे मत देवो किंवा स्वत: उमेदवार म्हणून निवडणुकीस उभा राहो. येथे राहणारे, गुजराथी, बंगाली, तामीळ, कन्नडीग, उडपी वगैरे सारे मनाने आपापल्या गावी, आपापल्या प्रांतात असतात. अगदी झोपडपट्टीपासून अलीशान बंगल्यापर्यंत या वृत्तीत फरक पडत नाही.

माझी तक्रार अशी आहे की, पुण्या—मुंबईसारख्या प्रचंड शहरातील निवडणुकीस उभा राहिलेला एकही उमेदवार नागरिकांची ही प्रवृत्ती लक्षात घेत नाही. निवडणुकीच्या वेळची उमेदवारांची पत्रके वाचून पहा, त्यात गावाकडचा उल्लेखही नसतो. 'आम्ही झोपडपट्टीवाल्यांस घरे बांधून देऊ—आम्ही महानगरपालिकेच्या व्यवहारातील भ्रष्टाचार थांबवू—आम्ही शहर स्वच्छ ठेवण्यास झटू—आम्ही रस्ते चांगले करू—' असलीच वचने त्यात असतात. कुणाला घरे हवी आहेत? कुणाला पाणी हवे आहे? कुणाला रस्ते चांगले हवे आहेत? आम्हा नागरिकांना आमचे गाव हवे आहे.

◻

पुण्यातील गेल्या पंधरा दिवसातील संध्याकाळच्या वेळा, निवडणुकीने दुमदुमल्या. त्यातील कुठली संध्याकाळ 'संध्याकाळचे पुणे' यासाठी निवडावी हे ठरविणे कठीण होते. मिरवणुकी निघत होत्या. व्याख्याने झडत होती. त्यांत एक व्याख्यान आपले मुख्यमंत्री श्री. शरद पवार यांचे होते. या निवडणुकीत हाताच्या बोटावर मोजण्याइतकी थोडी भाषणे चांगली झाली. त्यांतले एक शरद पवारांचे होते. अर्थात मुख्यमंत्रीपद बाजूला ठेऊन ते भाषणास आले होते. त्यांनी मुंबई—पुणे यासारख्या शहरांतील, पाण्याच्या, स्वच्छता राखण्याच्या, रस्त्याच्या, झोपडपट्टीच्या समस्या केवढ्या जगडव्याळ आहेत हे सांगितले. ते म्हणाले,'यातील प्रत्येक समस्या जर सोडवावयाची असेल तर प्रत्येकी दोनशे, तीनशे, चारशे कोटी रुपयांची जरूर आहे. आपल्याला ही कामे करणे शक्य नाही म्हणून जागतिक बँकेचे अध्यक्ष मॅक्नामारा यांच्याकडून आपणास सहाय्य मिळणार आहे. मॅक्नामारा त्या पहाणीसाठी मुंबईत आले तेव्हा पूर्वीच्या लोकांप्रमाणे आम्ही त्यांना फाइव्हस्टार हॉटेलात न नेता, विमानतळावरून थेट धारावीला नेले व तेथील झोपडपट्ट्यांतून हिंडविले. नाकाला रुमाल लावून त्यांनी सारे पाहिले. तेथून आम्ही त्यांना तेलीगल्लीत नेले. तेथे अनेक घरे बांबू, वासे लावून उभी ठेवली आहेत. तेथे रोज एखादे घर पडते, एखादे माणूस जायबंदी होते. ही घरे पाहिल्यावर त्यांत शिरण्याचीसुद्धा हिंमत होत नाही. ही घरे पाहून झाल्यावर आम्ही मॅक्नामारांना पाण्यासाठी उभ्या असलेल्या प्रचंड रांगा दाखविल्या. आता जागतिक बँकेकडून या समस्यांसाठी पैसे मंजूर झाले आहेत व अधिक होत आहेत' असे पवार यांनी सांगितले.

मुख्यमंत्री पवार यांनी ही माहिती निवडणुकीच्या संदर्भात सांगितली. संदर्भ असा होता. अशा समस्या जर यशस्वी सोडवायच्या असतील तर वरती जो पक्ष व मते आहेत तीच खालपर्यन्त असतील तर काम करणे सुगम होईल. यासाठी अपक्षांना निवडून द्या असे जे म्हणतात ते चूक आहे. पुलोद उमेदवारांनाच निवडून देणे जनतेच्या हिताचे होईल.

प्रचाराच्या निमित्ताने का असेना, शहरातील विदारक परिस्थितीचे जे चित्र आपल्या मुख्यमंत्र्यांनी उभे केले ते सर्व उमेदवारांनी व नागरिकांनी डोळ्यापुढून घालवू देऊ नये. शहराची काय स्थिती होणार आहे हे डोळ्यापुढे आणावे. आणि आता मी जे सांगतो आहे त्याकडे नीट लक्ष द्यावे. उमेदवारांनी आपण शहराचे याव करू आणि त्याव करू, झोपडपट्टीचे पुनर्वसन करू, मुबलक पाणी देऊ, नवी घरे बांधू, एकही नागरिक बेघर राहू देणार नाही, स्वच्छता राखू, अशी वचने देऊ नये. ज्या वेगाने झोपडपट्ट्या वाढत आहेत, घरे पडत आहेत, पाणी अटत आहे, घाण वाढत आहे, त्या वेगाला आवरण्यास तीन मॅक्नामारा अपुरे पडतील. आज शहरातील नागरिकांची भयंकर दुरावस्था पाहून वाईट वाटून मॅक्नामारा पैसे देतील; पण पाच वर्षांनी आता केलेल्या सोई अपुऱ्या पडू लागतील. पुढे पुढे उमेदवारांच्या वचनांवर कुणी विश्वास ठेवणार नाही. यासाठी उमेदवारांनी आताच आपल्या प्रचाराचा पवित्रा बदलावा. नागरिकांच्या मनात लपलेले आपल्या गावाचे प्रेम जाणून त्याचा फायदा घ्यावा आणि त्यांना आपल्या गावी जावेसे वाटेल अशी परिस्थिती निर्माण करावी. आपापल्या गावी जाऊन राहणारास सवलती द्याव्यात. एकीकडे गावच्या स्वच्छ हवेची तारिफ करावी. गावागावांनी मिळून मुंबईतील कारखाने दत्तक घेण्याच्या योजना काढाव्यात. मुंबई-पुण्यात आल्यामुळे शेतीचे ज्ञान विखुरले गेले असल्यास रिफ्रेशर कोर्स द्यावेत. पुष्कळांना सापांची भीती वाटते त्यांना सापांना व बेडकांना भिण्याचे कारण नाही अशी व्याख्याने द्यावीत. चित्रपट वगैरेंना आपण मुकू असे पुष्कळांना वाटेल. त्यांना गावी चित्रपट पहायला मिळेल अशी हमी द्यावी.

आणखी कितीतरी तऱ्हेने शहरातील नागरिकांची मने उमेदवारांना वळविता येतील. मी खात्रीने सांगतो की, भविष्यांतील निवडणुका 'शहर सोडा' हा प्रचार करूनच उमेदवारांना जिंकता येतील. भावी उमेदवारांनी माझे हे मार्गदर्शन विसरू नये.

खरं सांगायचं म्हणजे माझाच निवडणुकीला उभे राहण्याचा बेत आहे. कल्याणच्या धारपुरेसारखे निवडून यावे अशी माझी महत्त्वाकांक्षा आहे. कारण माझ्याजवळ वीस हजार रुपये नाहीत. शहरे सोडा हा माझा कार्यक्रम राहील आणि मी फक्त प्रचाराचे एक पोस्टकार्ड तुम्हाला पाठवीन. 'तुमचा आशिर्वाद हवा' म्हणत मी किंवा माझी माणसे तुमच्या घरी येऊन त्रास देणार नाहीत. माझी रिक्षा हिंडणार नाही आणि तुमचे कान बधीर करणारा स्पीकर असणार नाही. माझा बूथ असणार नाही. मतदानाच्या दिवशी मी पुण्यात राहणारच नाही. आम्ही सर्व कुटुंबीय फराळाचे घेऊन बनेश्वरला जाऊ. आम्ही संध्याकाळी परत येऊ. तोपर्यन्त तुम्ही मला निवडून दिलेले असेलच. मात्र धारपुऱ्यांच्या वेळी दोन पैशास पोष्टकार्ड होतं. आता पंधरा नव्या पैशास आहे. तेव्हा हा फरक लक्षात घेऊन माझ्या मित्रमंडळींनी एकेक रुपयाऐवजी माझ्या निवडणूक फंडाच्या पेटीत पाचपाच रुपये टाकावेत.

मला तुम्ही निवडून देताच माझी 'शहर सोडा' ही चळवळ सुरू होईल. पहिली बॅच वाईकरांची असेल. मुख्यमंत्र्यांचे आशिर्वाद घेऊन ही बॅच पुण्याची हद्द सोडील आणि आपल्या मनांत असलेल्या आपल्या लाडक्या वाईकडे चालू लागेल. ◻

# हिंदुस्थान अँटिबायोटिक्स, पिंपरी : खुलासा

विषय : 'माणूस' साप्ताहिकाचे दि. १४–४–७९चे अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखाबाबत आणि दि. ५–५–७९ चे अंकात छापलेल्या पत्राबाबत.

वरील लेखातील सदोष व चुकीची माहिती कोणती व प्रत्यक्ष वस्तुस्थिती काय आहे ते येथे स्पष्ट करीत आहोत.

○ या लेखात लिहिल्याप्रमाणे अॅम्पिसिलीन प्लांटबाबत आपल्या लेखात असे विधान केले आहे की, या प्लांटची उत्पादनक्षमता वार्षिक ३० टन असून सध्या येथे अजिबात उत्पादन होत नाही. अॅम्पिसिलीन प्लांटची निर्मितिक्षमता या लेखात लिहिल्याप्रमाणे प्रतिवर्षी तीस टन इतकी नसून पाच टन आहे. इतकेच नव्हे तर अद्यापही हा प्लांट पूर्णावस्थेस पोहोचला नसून तेथे प्रायोगिक स्तरावरच कार्य चालू आहे. तरी सुद्धा येथील उत्पादन अपेक्षित उत्पादनक्षमतेपेक्षाही १५० टक्क्यांनी अधिक आहे. थोडेफार बदल आणि सुधारणा केल्यानंतर ही उत्पादनक्षमता २००% पर्यंत अधिक होण्याची शक्यता आहे. याशिवाय या ५ टन उत्पादनक्षमता असलेल्या प्लांटची यापुढील विस्तारयोजना कार्यवाहीत असून ती पूर्ण झाल्यानंतर म्हणजे सुमारे दीड वर्षानंतर ती ३५ टनांपर्यंत जाईल.

○ गेल्या दीड वर्षात शंभर नवीन अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे हे या लेखातील विधानही असत्य आहे. प्रत्यक्षात एकूण साठ ऑफिसर्स घेण्यात आले असून, त्यातील काही सरकारी नियमाप्रमाणे अनुसूचित जमातीचे आहेत.

○ पार्लमेंट अॅक्ट १९६८ अन्वये सी. आय. एस्. एफ्.ची नियुक्ती करणे व त्यांच्या निवासाची व्यवस्था करणेही एच. ए. लिमिटेडची जबाबदारी होती. त्याअन्वये कारखान्याचे वसाहतीतील काही घरे त्यांना उपलब्ध करून देण्यात आली होती; परंतु ही घरे कर्मचाऱ्यांना उपलब्ध करून देण्याची तीव्र मागणी येथील कामगार संघटनेने केल्यावरून सी. आय. एस्. एफ्. चे सेवकांसाठी नवीन वसतिस्थान बांधणे संस्थेस भाग पडले. अशा स्थितीत या कारणासाठी खर्च करणे योग्य नव्हते हे आपल्या लेखातील विधान कितपत रास्त आहे ?

○ जेंटामायसिन या औषधाच्या निर्मितीचे तांत्रिक ज्ञान भारतात तर उपलब्ध नव्हतेच; परंतु परदेशातूनही हे ज्ञान मिळणे अत्यंत अवघड झाले होते. अनेक अडचणी पार करून प्रयत्नांची पराकाष्ठा करून शेवटी हे ज्ञान हंगेरी या देशाकडून मिळविण्यात आम्ही यशस्वी झालो. तेव्हा हंगेरीच्या सहकार्याने येथील जेंटामायसिनचे उत्पादन त्वरित सुरू करावे, प्लांटच्या कार्यास विनाविलंब प्रारंभ व्हावा यासाठी हंगेरीमधील तंत्रज्ञासमवेत प्रत्यक्ष वाटाघाटी व करारनामा करण्यासाठी आमचे अध्यक्ष व प्रबंधनिर्देशक यांना हंगेरीस स्वतः जाणे आवश्यकच होते.

○ पेनिसिलिन व स्ट्रेप्टोमायसिन या दोन औषधांच्या उत्पादनात झालेली वाढ टिकून राहिली नाही हे या लेखातील विधानही पूर्णतया असत्य आहे. १९७८–७९ या आर्थिक वर्षात पेनिसिलिनच्या फर्स्ट क्रिस्टलसचे अपेक्षित उत्पादन १०५ दशलक्ष मे. यु. इतके असूनही ते प्रत्यक्षात १३७ दशलक्ष मे. यु. इतके झाले. स्ट्रेप्टोमायसिनचे एकूण उत्पादन ८५ टन इतके अपेक्षित असता ते १००·४ टन झाले आणि विशेष म्हणजे हे उच्चांक निर्माण करणारे उत्पादन लेखात नमूद केलेल्या 'औषधी उद्योगाचा अनुभव नसलेल्या' व्यवस्थापनाखाली झालेले आहे !

○ व्हिटॅमिन सी प्लांटचे बांधकाम १९६८ मध्ये सुरू होऊन १९७३ मध्ये पूर्ण झाले. त्यापुढील ५ वर्षांत या प्लांटमधून सहा टनांचे आसपास व्हिटामिन सी. चे उत्पादन झाले. केंद्र सरकारने नियुक्त केलेल्या समितीने या संबंधात बारकाईने अभ्यास करून निर्मितिक्षमता सुधारण्यासाठी काही उपाययोजना सुचविल्या. या सूचनांची अंमलबजावणी करून गतवर्षात या प्लांटमधून प्रायोगिक स्तरावर उत्पादन सुरू करण्यात आले. हे उत्पादन सुरू झाल्यापासून पहिल्या दोन महिन्यातच गेल्या काही वर्षांपेक्षा अधिक उत्पादन या प्लांटपासून निर्माण झाले आहे.

○ टेट्रासायक्लिनच्या कॅप्सुलस त्यांच्या विशिष्ट रंगामुळे संरक्षणविभागाकडून परत करण्यात आल्या. कॅप्सुलसचा दर्जा कोणत्याही प्रकारे निकृष्ट होता म्हणून नव्हे. काही युरोपियन देशांतून येणाऱ्या बल्कसंबंधात अशा प्रकारची रंगविषयक समस्या निर्माण झाल्याचे हा बल्क आयात करणाऱ्या एस. टी. सी. या संस्थेच्या निदर्शनाला आणून देण्यात आले आहे.

## आदरातिथ्य खर्च

○ 'आदरातिथ्यावरील खर्च कंपनीच्या हिशेबाच्या पुस्तकातून अदृश्य केला' हे या लेखातील एक पूर्णपणे असत्य विधान आहे. सरकारी मालकीच्या कारखान्यांचे हिशेब अंतर्गत हिशेबतपासनीस, नंतर व्यावसायिक हिशेबतपासनीस, त्यानंतर सरकारी हिशेबतपासनीस तपासतात. याशिवाय पार्लमेंटने नियुक्त केलेली कमिटी ऑन पब्लिक अंडरटेकिंग्ज सर्व हिशेबांची शहानिशा करू शकते. अशा स्थितीत कंपनीच्या हिशेबांच्या व्यवहारात गैरकारभार घडणे केवळ अशक्य आहे.

○ संचालकांच्या मर्जीतील जनरल मॅनेजर्सना कंपनीची गाडी, ड्रायव्हर व पेट्रोल आठवड्यातून दोन दिवस फुकट देण्याच्या आज्ञा देण्यात आल्या आहेत हे लेखातील विधानही पूर्णतया असत्य आहे. सर्व सरकारी मालकीच्या कारखान्यांतून वरिष्ठ अधिकाऱ्यांना ज्याप्रमाणे नियमानुसार पैसे आकारून या सोयी उपलब्ध करून

देण्यात येतात त्याच पद्धतीनुसार या कारखान्यांतही सशुल्क सोयी उपलब्ध करून देण्यात येतात.

० उत्पादनासंबंधी सखोल तंत्रज्ञान संबंधितांकडून मिळविणे ही गोष्ट दुकानात पैसे टाकून एखादी वस्तू विकत घ्यावी इतकी सरळ व सोपी नाही. ते ज्ञान आहे. ते एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीला मिळताना काही प्रक्रिया घडून येत असते. ही प्रक्रिया घडून येण्यासाठी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर युनोतर्फेही मुद्दाम चर्चासत्रे आयोजित केली जातात. एका उत्पादक कंपनीकडून दुसऱ्या उत्पादक कंपनीला जेव्हा अशा प्रकारे तंत्रज्ञान मिळविणे आवश्यक असते तेव्हा ते विविध स्तरांवरून मिळविणे जरूर असते. यासाठी प्रत्यक्ष चर्चा-विनिमय होणे आवश्यक असते. ही चर्चा-विनिमय ज्या देशातून तंत्रज्ञान घ्यावयाचे त्या देशात, त्या देशातील तज्ज्ञांच्या उपस्थितीत होणे क्रमप्राप्तच आहे. प्रत्यक्ष चर्चा-विनिमय न करता कागदोपत्री तंत्रज्ञान प्राप्त करण्याचे ठरविल्यास ते अशक्य तर आहेच, पण त्यामुळे तंत्रज्ञान मिळण्यास जो विलंब लागेल त्यामुळे भांडवली खर्च विचारात घेता होणारे अफाट आर्थिक नुकसान हे केवळ अव्यवहार्य ठरेल.

० जेंटामायसीनच्या तंत्रज्ञानासंबंधात हंगेरीबरोबर जो करारनामा करण्यात आला त्याला अनुसरूनच आमच्या कारखान्यातील संबंधित व्यक्तींनी हंगेरीस जाऊन चर्चा-विनिमय केला. त्यानंतर हंगेरीहूनही काही तंत्रज्ञ मंडळींनी येथे येऊन जेंटामायसीनच्या उत्पादनासंबंधात प्रत्यक्ष मार्गदर्शन केले.

जेंटामायसीन या (मूत्रपिंडाच्या आजारावर अत्यंत प्रभावी अशा) औषधाची निर्मिती आपल्या इथे त्वरित निर्माण होण्याच्या दृष्टीने जेंटामायसीन प्लांटमधून उत्पादन सुरू करणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी येथील तंत्रज्ञांनी हंगेरीस व हंगेरीमधील तंत्रज्ञांनी येथे प्रत्यक्ष भेटी देणेही नजिकच्या भविष्यकाळात आवश्यक ठरणार आहे. ज्या वेळेस या प्लांटमधून पूर्णपणे उत्पादनास प्रारंभ होईल तेव्हा हे औषध निर्माण करणाऱ्या जगातील ५–६ राष्ट्रांच्या पंक्तीत भारताला स्थान मिळणार आहे, ही ध्यानात घेण्यासारखी महत्त्वाची बाब आहे.

० 'कारखान्याच्या रिसर्च विभागातून स्पेक्ट्रोफोटोमीटर हे किमती यंत्र गहाळ झाले होते, त्याचा फक्त सांगाडाच परत मिळाला आहे' हे लेखातील विधान अतिशय चुकीचे आहे. हे यंत्र दुरुस्तीसाठी बाहेर पाठवले होते व ज्या स्थितीत ते पाठवले होते त्याच स्थितीत ते परत आलेले आहे; परंतु या यंत्रासंबंधात 'काही अधिकाऱ्यांनी हे यंत्र संगनमत करून विकले तरी त्यांच्याविरुद्ध काहीही कारवाई केलेली नाही' अशा स्वरूपाच्या अनेक खोडसाळ अफवा पसरविल्या गेल्या होत्या. त्याचे निराकरण करण्यासाठीच प्रसिद्धी विभागातर्फे सत्य स्थितीचा खुलासा करणे भाग पडले.

० मेथेनॉलच्या चोरीच्या प्रकरणाची चौकशी प्रत्यक्ष सी बी. आय. नेच करून आपला अहवाल दिला. तेव्हा त्या अहवालाच्या आधारेच दोषी ठरलेल्या कर्मचाऱ्यांच्या विरुद्ध कारवाई करण्यात आली आहे. अशा प्रकारे मेथेनॉलची चोरी होत असावी असा संशय या कर्मचाऱ्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना होता व त्या दृष्टीनेच दोषी व्यक्तींना पकडण्याच्या उद्देशानेच त्यांनी जाळे टाकलेले होते. दोषी कर्मचारी त्याप्रमाणे जाळयात पकडले गेल्यावर अधिकाऱ्यांच्या विरुद्ध कारवाई करण्याचा प्रश्नच कोठे निर्माण होतो?

० 'औषधउत्पादनाचे दोन विभाग पूर्णपणे बंद पडले आहेत' हे लेखातील विधान तर समजूच शकत नाही. कोणते विभाग बंद पडले आहेत? वस्तुतः स्ट्रेप्टोमायसीन, पेनिसिलिन, फायनल प्रॉडक्टस, क्लिनिकल प्रॉडक्टस, नॉन पेरेंटरल सेक्शन आदी सर्व विभाग पूर्णतः कार्यरत असून तेथे विक्रमी उत्पादनही झालेले आहे. इतकेच नव्हे तर व्हिटॅमीन सी प्लांट, अॅग्रिकल्चरल सेक्शन ह्यापूर्वी पूर्णांशाने कार्यरत नसलेल्या विभागातही आता नियमित स्वरूपात उत्पादन सुरू झाले आहे. जेंटामायसीनच्या उत्पादनासाठी नवीन सुविधाही उपलब्ध करण्यात आल्या, ज्यामुळे जेंटामायसीन उत्पादन अधिक प्रमाणात सुरू झाले. परिणामी त्या अत्यंत महत्त्वपूर्ण औषधाच्या बाजारातील किमती एकदम खाली आल्या हे आपल्या लेखातही मान्य करण्यात आले आहे.

० 'पंपिंग अॅण्ड अॅजिटेशन ऑफ व्हिस्कस फ्लूईड्स्' (कुप्रवाही पदार्थांचे परिवहन आणि प्रवाहीकरण) या विषयावरील चर्चासत्र कंपनीने आयोजित केले नव्हते तर ते 'इंडियन इन्स्टिटयूट ऑफ केमिकल इंजिनियर्स या संस्थेतर्फे आयोजित करण्यात आले होते; परंतु कंपनीच्या दृष्टीनेही हा प्रश्न तितकाच महत्त्वाचा व जिव्हाळ्याचा आहे. कारण कंपनीमध्ये ज्या कार्यपद्धतीने उत्पादन होते त्या पद्धतीशीही हा प्रश्न निगडीत आहे.

० इंडियन मेडिकल असोसिएशनचे सहकार्याने आयोजित केलेले 'सिलेक्शन ऑफ प्रॉस्पेक्टिव ड्रग्ज' या विषयावरील चर्चासत्रही सर्वथा उचितच होते. कारण औषध निर्मितीच्या क्षेत्रात सरकारी मालकीच्या औषधी कारखान्यांचेच वर्चस्व असावे हे हाथी कमिशनने पुरस्कारलेले व पार्लमेंटने स्वीकारलेले धोरण आहे. या धोरणाचीच अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने ६ व्या पंचवार्षिक योजनेमध्ये औषध निर्मितीच्या कोणत्या विस्तार योजना हाती घेता येतील याबाबत एच. ए. लि. योजना सादर करावयाच्या असल्यामुळे या चर्चासत्राचे विशेष महत्त्व होते. एच. ए. ने सरकारकडे त्यानुसार १२२ कोटी रुपयांच्या विस्तार योजना सादर केल्या असून त्या सरकारच्या विचाराधीन आहेत.

० हामायसीन हे औषध कंपनीने १९६४ साली तयार करून प्रचारात आणले; परंतु औषध टिकवून ठेवण्यासाठी –४० सेंटिग्रेड इतके तपमान आवश्यक आहे असे ध्यानी आल्याने व ते प्रत्यक्षात परवडणारे नसल्याने नवीन व्यवस्थापनांच्या धोरणानुसार संशोधन केन्द्राने याबाबत विलक्षण चिकाटीने प्रयत्न करून आता हे औषध +५ सेन्टिग्रेड तपमानात टिकू शकेल अशा पद्धतीने तयार केले आहे.

## आणखी काही दुखणी

० आपल्या लेखात आपण या कारखान्यातील काही 'दुखण्यां'चा उल्लेख केला आहेच. उदा. (अ) जरूरीपेक्षा जास्त स्टाफची नेमणूक झाली आहे. त्यातच कर्मचाऱ्यांच्यामध्ये आळशी व कामचुकारपणाची वृत्ती अतोनात वाढलेली आहे. ओव्हरटाइम काम करण्याकडेही त्यांची फार प्रवृत्ती वाढलेली आहे. (ब) काही सन्माननीय अपवाद वगळता अकार्यक्षम, आळशी, अपुऱ्या शैक्षणिक योग्यतेच्या अधि-

काऱ्यांची संख्या वाढली आहे. (क) सर्वच विभागातून जुन्यापुराण्या व कालबाह्य ठरलेल्या पद्धतीप्रमाणेच अजूनही कामकाज चालले आहे. जबाबदारीने पुढे होऊन काम करण्यापेक्षा पडेल ते काम कसे तरी उरकण्याकडे सर्वसाधारण कल आहे.

याशिवाय आणखीही पुढील दुखण्यांची या यादीत भर घालता येईल–

(अ) कित्येक कर्मचाऱ्यांनी आपल्या जवळच्या नातेवाइकांच्या नावावर दुकाने चालवणे व छोटे उद्योगधंदे चालवणे इ. अनेक जोड-धंदे चालवले आहेत, ज्यासाठी त्यांचा सारा वेळ व श्रम खर्ची पडत असतात. (ब) पूर्ण वेळ–अर्ध वेळ एजन्सी घेऊन चक्क व्यापार सुरू केला आहे. (क) वसाहतीतच नव्हे तर इतरत्रही 'मटका' व्यवहार जोरात चालू आहे. (ड) बाहेरील कामगारसंघटना चालविणे. (इ) राजकारणात सक्रिय भाग घेऊन निवडणुकीला उभे राहणे. (फ) वृत्तपत्र वार्ताहराची कामे करणे इत्यादी. या सर्व परिस्थितीत कारखान्यातील कामावर किती दुष्परिणाम होतो हे लिहिण्याची आवश्यकताच नाही. व्यवस्थापनानेही या संबंधात काही शिस्त, बंधने, नियमपालन याचा आजपर्यंत विशेष आग्रह धरला नाही हेही सत्य नाकारता येत नाही. कारखान्याच्या सध्याच्या व्यवस्थापनाला कर्मचाऱ्यांतील मूलभूत सद्‌गुणांवर पूर्ण विश्वास आहे; परंतु त्यांच्या अंगी वर्षानुवर्षे जे दोष वाढले आहेत ते मात्र घालविण्याची व्यवस्थापनाची ठाम इच्छा आहे.

० या फॅक्टरीतील तीन प्रकल्पांची फेडोतर्फे १० महिन्यांत पूर्तता करण्यात येणार होती हे अतिशय चुकीचे विधान आहे. या प्रकल्पांसाठी लागणारे साहित्य परदेशातून एवढ्या काळात येणेसुद्धा केवळ अशक्य आहे. कारण सामान परदेशातून आणण्यासाठी लागणारी वाहतूक व्यवस्था, कस्टमखात्याच्या नियमांची पूर्तता व नंतर येथे जागेवर ते सर्व साहित्य आणण्यात लागणारा काळ विचारात घेता खाजगी किंवा सार्वजनिक क्षेत्रात उभारण्यात येणाऱ्या प्रकल्पांना अनिर्बंध उशीर लागणे अपरिहार्यच होते. या सर्व अडचणींवर मात करूनही फेडोतर्फे प्रकल्प उभारणीचे कार्य अनेक अडचणींवर मात करून नियोजनाप्रमाणेच चालू आहे.

० मल्टीनॅशनल (बहुराष्ट्रीय संस्था) लोन लायसेन्सवर मिश्रणे तयार करण्याचे काम करतात व अशी फॉर्म्युलेशन्स अमाप फायदा घेऊन बाजारात विकली जातात हे सरकारला मान्य नाही. बहुराष्ट्रीय कंपन्या जे करतात त्याच्याबरोबर दुसऱ्या टोकाचे कार्य करण्याचा एच. ए. लि. प्रयत्न करीत आहे. फॉर्म्यूलेटेड प्रॉडक्टस (मिश्रणे) अधिक प्रमाणात विकली जावीत आणि बलकचे स्वरूपातील औषधांची विक्री कमी व्हावी यासाठी एच. ए. लि. लोन लायसेन्सवर इतर मिश्रणे तयार करणाऱ्या कंपन्यांकडून मिश्रणे तयार करून घेत आहे आणि अशी औषधे स्वतःच बाजारात विक्रीसाठी आणत आहे. याबाबत हेही येथे स्पष्ट करणे जरूर आहे की, आपल्या देशात औषधी बाटल्यांची भरणी करणारे फार थोडे कारखाने आहेत. त्यांना लोन लायसेन्सवर काम करण्यासाठी आम्ही विचारलेही होते; परंतु एच. ए. लि. साठी केवळ औषध भरणीचे काम करण्यासाठी कुणीही तयार नाही असा अनुभव आहे.

० कारखान्याला होणाऱ्या तोटयाबाबत व्यवस्थापन कामगारांना जबाबदार धरीत आहे हे विधानही गैरसमज निर्माण करणारे आहे. वस्तुतः याबाबतचे व्यवस्थापनाचे मत जाहीर करणारे एक निवेदन व्यवस्थापनाने वृत्तपत्रातूनही जाहीर केले आहे. अर्थात हेही येथे नमूद करणे जरूर आहे की, येथील कर्मचाऱ्यांचे द. म. सरासरी मासिक वेतन रु. ९३५ असून इतर सुविधांसाठी प्रत्येक कर्मचाऱ्यामागे द. म. ११०/– रु. खर्च होतात. त्यामध्ये उपहारगृहामार्फत देण्यात येणाऱ्या सर्व सोयी, (ज्यामुळे येथे एक मोठा बटाटावडा चटणीसह पाच पैशात व कपभर चहा दहा पैशात दिला जातो) वाहतुकीसाठी कंपनीचा बस पास मासिक सात रुपयात दिला जातो. (हाच प्रवास पी. एम. टी. ने करावयाचा झाल्यास मासिक खर्च किमान पन्नास रुपये येईल) कर्मचारी व त्यांच्यावर नियमाप्रमाणे अवलंबून असलेल्या कुटुंबियांच्या औषधोपचारासाठीही फार मोठ्या प्रमाणात खर्च केला जातो. राहण्याच्या जागेसाठी देण्यात यावयाचा अलौन्सवर मोठ्या प्रमाणात खर्च होतो. कर्मचाऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठीही मुक्त हस्ते मदत दिली जाते. त्याप्रीत्यर्थ होणारा खर्चही बराच मोठा आहे.

## कल्याणकारी योजनांवरील खर्च

० त्यामुळे या संस्थेतील कर्मचाऱ्यांचेसाठी होणारा वेतन व इतर कल्याणकारी योजनावरील खर्च अफाट आहे. त्यामानाने कामगारांची उत्पादन शक्ती कमी आहे हेही आपण मान्य केलेच आहे. याशिवाय आपण हेही मान्य केले आहे की, येथील कामगारांना ओव्हरटाईमवर काम करण्याचा विलक्षण मोह जडला होता. कारखाना तोटयात जाण्यासाठी वरील परिस्थितीही काही अंशी कारणीभूत होती हे जरूर ध्यानीं ठेवले पाहिजे.

० आपण असे एक विधान केले आहे की फर्मेंटेशनचे टायटर कमी अधिक होणे याचे कारण सापडू शकत नाही. तज्ञसुद्धा त्याचे निदान करू शकत नाही. असे असेल तर कारखाना तोटयात चालला म्हणून किंवा उत्पादन कमी होते म्हणून आपण म्हणता तसे नेमके सध्याचे व्यवस्थापनास तरी कसे जबाबदार धरता येईल ? खरे पहाता सध्याच्या व्यवस्थापनाखालीच गेल्या आर्थिक वर्षात जवळ जवळ सर्व उत्पादनांचे उच्चांक गाठण्यात आले आहेत.

० इन्सेन्टिव बोनस स्कीम कामगारांना लागू करणारी एच. ए. एल. ही पहिली संस्था होती हे सत्य आहे परंतु त्या स्कीममध्ये काही दोष होते. विशेषतः उत्पादन वाढीचे दृष्टीने त्या योजनेचा काही फायदा होऊ शकला नाही.

० आजारी कारखान्याचे प्रश्न रुजवाती घालत बसल्याने सुटत नाहीत. विशेषतः जेव्हा शिस्तीचे प्रश्न येतात किंवा प्रत्यक्ष उत्पादनच धोक्यात येते तेव्हा व्यवस्थापनास आपली भूमिका निश्चयाने बजावावी लागते. मध्यंतरीचे काळात या कारखान्यात एका कर्मचाऱ्याने बेशिस्तीचे वर्तन करून आपल्या पर्यवेक्षकाशी व विभाग प्रमुखाशी अत्यंत अपमानकारक वर्तणूक केली, त्यावेळी व्यवस्थापकाने घेतलेल्या कायदेशीर भूमिकेबद्दल कामगार संघटनेने वाद निर्माण केले होते. त्यावेळीही उद्‌भवलेल्या परिस्थितीत व्यवस्थापनाने खंबीरपणे तोंड दिले.

० वर्क्स कमिटी स्थापन करण्याची व्यवस्थापनाला इच्छा नाही हे विधानही संपूर्ण चुकीचे आहे. गेले वर्षभर तरी वर्क्स कमिटीसाठी निवडणुका घ्याव्यात असा आग्रह व्यवस्थापनाने युनियनकडे धरला

आहे. येथे हेही नमूद करणे जरूर आहे की ग्रीव्हन्स कमिटी आणि प्रॉडक्शन कमिटी अस्तित्वात यावी यासाठी व्यवस्थापनाचे प्रयत्न प्रयत्न चालू होते. महाराष्ट्र राज्याचे कामगार मंत्री श्री. सुशील-कुमार शिंदे यांचे मध्यस्थीने अखेरीस ग्रीव्हन्स कमिटी अस्तित्वात आली आणि प्रॉडक्शन कमिटीचे निर्मितीसाठीही कामगार संघटनेने नुकतीच मान्यता दिली आहे.

० अधिकाऱ्यांना फारवेळ काम करावे लागते आणि त्यामुळे त्यांचा फार वेळ घराबाहेर जातो या विधानाबद्दल असे म्हणता येईल की, आपल्या सारख्या आरोग्य विषयक अनेक समस्या असलेल्या विकसनशील राष्ट्रात विशेषतः औषध निर्मितीसारख्या अत्यंत महत्त्वाच्या क्षेत्रात जबाबदारीचे काम करणाऱ्या अधिकाऱ्यानी स्वत: होऊनच कामात अधिकाधिक लक्ष घालून उत्पादनात कोणत्याही अडचणी निर्माण होणार नाहीत हे पाहणे अत्यंत महत्त्वाचे आहे. या जाणिवेनेच जबाबदार अधिकारी जरूर तेवढा वेळ काम करीत असतात. या शिवाय पुणे मुंबईसारखे येथे तासनतास प्रवासात घालवावे लागत नाहीत. प्रवासासाठी अनेक सुविधा उपलब्ध आहेत.

## विक्रीत वाढ

नवीन नेमलेल्या मार्केटिंग मॅनेजरांच्या कारकीर्दीत गेल्या आर्थिक वर्षातील विक्रीने तर नवीन विक्रम प्रथापित केला आहे. त्यांचे कारकीर्दीतच संपूर्ण विक्री विभागाची पुनर्रचना करण्यात आली. लखनौ, कोचीन व कलकत्ता येथे नवीन डेपो उघडण्यात आले आहेत. याशिवाय भारतात सर्व प्रमुख ठिकाणी नवीन स्टॉकिस्टस् व वितरक नेमण्यात आले आहेत. कोणतीही औषध उत्पादक संस्था केवळ सरकारी संस्थांना माल पुरविण्याचे आधारावर जगू शकणार नाही. व्यापारात सर्वांगीण वाढ करता यावी म्हणून विक्री विभागातील मेडिकल रिप्रिझेंटेटिव्हजची संख्या सुद्धा १९ वरून ७४ पर्यंत वाढविण्यात आलेली आहे. या योजनेमुळे गतवर्षी ट्रेड सेलस सुद्धा ८० लक्ष रुपयांवरून १०८ कोटी रुपयांवर गेला आहे.

० फॉर्म्युलेशन्स प्लॉंटमध्ये नव्याने नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांनी या महत्त्वाचे विभागातील कामात निश्चितपणे सुधारणा केली आहे. येथील कामाची गती वाढविणे, दर्जा वाढविणे व रिजेक्शन कामे करणे ही महत्त्वाची कामे त्यानी केली आहेत. रिजेक्शनचे प्रमाण २० वरून ५ वर आले आहे उत्पादन वाढीमुळे यावर्षी इंजेक्शन बाटल्यांची भरणी ५४ लक्ष रुपयांची, औषधी गोळयांचे उत्पादन ४७·२६ लक्ष रुपयांचे तर कॅप्सूलसचे उत्पादन ९·३१ लक्ष रुपयांचे झाले आहे.

० तंत्रज्ञानाचे देवघेवीबद्दल (टेक्नॉलजी ट्रॅन्स्फर) या संस्थेत बरेच कार्य झाले आहे. ही बाब अत्यंत महत्त्वाची व बिकट असून त्यासाठी त्या क्षेत्रातील तज्ञांनीच (डिझाइन अॅण्ड इंजिनियरिंग फर्म्स) जबाबदारी घेणे रास्त ठरते. आमच्या संस्थेतील विस्तार योजनांचे बाबतीतही हेच धोरण ठेवले आहे. याचा उत्कृष्ट परिणाम दिसून येत असून येथील सर्व विस्तार योजनांची प्रगती समाधानकारक असून १९८० साल अखेरपर्यंत सुमारे २४ कोटी रुपयांच्या या विस्तार योजना यशस्वी रीत्या पूर्ण होतील अशी आशा आहे. कन्सल्टंटस् नेमणुकीनंतर केवळ दोन वर्षांचे अवधीत हे काम पूर्ण होत आहे. आमच्याच संस्थातील व्हिटॅमीन सी प्लॉंटचे उभारणीचा पूर्वीचा अनुभव ध्यानी घेता वरील कामकाज किती शीघ्रगतीने होत आहे हे ध्यानी येते. कारखाना उभारणीचे कामात व्यत्यय आला किंवा उशीर झाला तर होणारे उत्पादन बुडण्यामुळे आर्थिक नुकसान तर होतेच पण बांधकामावरील खर्च वाढून यासाठी गुंतवलेल्या रकमेचे व्याजही वाढत जाते. यामुळे अशा प्रकल्पांची नुकसानी होते. अशी कामे अंतर्गतरीत्या करून घेण्यासाठी आवश्यक ती यंत्रणा व तंत्रज्ञही उपलब्ध असणे जरूर असते.

० टेंडर्स देण्याचे बाबत काटेकोर गुप्तता पाळणे आवश्यक असते. नाहीतर अनेक प्रकारची दडपणे व वशीले येण्याचा संभव असतो. एकदा टेंडर उघडले गेले की मग गुप्ततेचा प्रश्नच येत नाही,

० कन्सल्टन्सी फर्म्सच्या नियुक्त्या केल्यामुळे नवीन उत्पादनांची निर्मिती मूल्ये वाढली आहेत हेही बरोबर नाही. उपलब्ध कर्मचाऱ्यांचेकडून प्लॉंट उभारणीची कामे करून घेण्याने या कामाना फार विलंब तर लागलाच असता पण त्यात या विषयातील तज्ञांच्या देखरेखीचा व सल्ल्याचा अभावही राहिला असता. उपलब्ध कर्मचाऱ्यांचेकडून त्यांचे नेहमीचे कामाव्यतिरिक्त असे काम करून घेणे निश्चितच शहाणपणाचे ठरले नसते.

० फर्मेन्टेशन इ. सारख्या यंत्रणेस पक्क्या इमारती न बांधता स्टील स्ट्रक्चर्स उभी करणे हे शास्त्र अत्याधुनिक व उपयुक्त आहे.

० स्ट्रेप्टोमायसीन स्ट्रेन सुधारण्यासाठी उपलब्ध असलेल्या सुविधा वर्षभर वापरल्या जात नाहीत हे विधान सत्यावर आधारीत नाही. स्ट्रेन सुधारण्याचे काम सातत्याने चालू आहे इतकेच नव्हे तर गतवर्षी त्याचा पुरेसा उपयोगही झाला आहे.

० व्यवस्थापन सल्लागारांची नियुक्ती ही सध्याचे येथील परिस्थितीची आवश्यक गरज होती. येथे अनेक कामगार विषयक प्रश्न—समस्या होत्या शिवाय कामगारांची उत्पादनक्षमता फार कमी होती. अशा परिस्थितीत या सल्लागारांनी अनेक समस्या यशस्वीपणे हाताळून येथील वातावरणातील तणाव कमी केले आहेत. आजार अधिक बळावला की आपण स्पेशॅलिस्ट डॉक्टरकडे जातो तसेच गंभीर स्वरूपाचे प्रश्न वा समस्या निकालात काढण्यासाठी अशा तज्ञांची नियुक्ती आवश्यक ठरते.

० या कारखान्याचे अनेक आजार आवाक्यात आणणे हे नवीन व्यवस्थापनापुढे मोठे आव्हान होते. येथील कर्मचाऱ्यांना शिस्त लावून विधायक मार्गाने नेणे व कामगाराचे शक्तीचा रास्त उपयोग उत्पादनासाठी करून घेणे ही महत्वाची कामे करावयाची होती. ओव्हरटाइमचे दुष्टचक्र थांबविणे हे त्यापैकीच एक आव्हान होते. या संस्थेत आता अधुनिकीकरणाची व विस्ताराची अनेक कामे हाती घेण्यात आलेली आहेत. त्यासाठी उच्चशिक्षित तरुण व उत्साही वाकबगार इंजिनीअर्सची नितांत आवश्यकता होती. तत्पूर्वी येथील इंजिनियरिंग विभागात काम करणाऱ्या ६०० कर्मचाऱ्यामध्ये केवळ सहा क्वालिफाईड इंजिनियर्स होते.

० नवीन येणाऱ्या तांत्रिक बाबींची माहिती (ट्रॅन्स्फर ऑफ टेक्नॉलजी) जबाबदारीने घेणे आणि सध्याच्या प्लॉंटस्ची कुचंबणा थांबविण्यासाठी नवीन टेक्नीकल सर्व्हिसेस विभाग उघडणे अत्या-

पृष्ठ २४ वर

# कलकत्ता मेल

तारा पंडित

## नावात काय नाही ?

आपण नेहमी म्हणतो–नावात काय आहे ? पण मी म्हणते, नावात काय नाही ? नाव हे व्यवस्थित उच्चारलं पाहिजे आणि व्यवस्थित लिहिलंही पाहिजे, नाही तर अनर्थ ओढवतात. आता परवाचीच घटना बघा. एक हायकोर्ट-जज्ज 'मैत्र' म्हणून आहेत (Maitra). एका लॉ जर्नलने त्यांचं नाव 'मित्र' म्हणून छापलं (Mitra). आता जर्नलवाल्यांना वाटलं असेल, स्पेलिंगमध्ये 'a' चुकून पडला असावा. त्यांनी सोयिस्करपणे Maitra चा Mitra केला आणि त्यांची केस छापली. जर्नल पाहताच जज्जसाहेबांचं पित्त खवळलं. ते जर्नलच्या प्रतिनिधीजवळ म्हणाले, 'काय हे तुमचे लोक ? अहो, मी ब्राह्मण असताना मला चक्क कायस्थ बनवून टाकलं की त्यांनी ! This is no good ! अरे, 'मित्र' हे कायस्थ असतात. मी 'मैत्र' आहे–ब्राह्मणजातीचा ! मला खालच्या जातीत पाठवण्याचा यांना काय अधिकार ?'

आता सांगा ! खरं तर ही आडनावं आणि हा ब्राह्मण–कायस्थवाद यापैकी काहीही जर्नलवाल्यांच्या गावीदेखील नव्हतं! पण केवढा अर्थाचा अनर्थ झाला !

ओघाओघानेच आणखीही एका गोष्टीचा उल्लेख करावासा वाटतो. पूर्वी 'कलकत्ता मेल' ह्या सदरात नक्षलवादी नेता चारु मजुमदार यांचा अनेकदा उल्लेख आलेला आहे. 'माणूस'च्या संपादकांना वाटलं असावं की, मी 'म'चा उकार द्यायलाच विसरले असेन. म्हणून प्रत्येक वेळी त्यांनी अगदी आठवणीने 'मजुमदार' यांना 'मुजुमदार' बनवून टाकलं. वास्तविक 'मजुमदार' हे बंगाली आडनाव आहे आणि 'मुजुमदार' हे महाराष्ट्रीय आडनाव आहे. त्या वेळी अर्थातच हा खुलासा करण्याच्या भानगडीत मी पडले नाही. कारण त्यामुळे काही अनर्थ ओढवण्याचा संभव नव्हता. मी लिहिलेला स्तंभ चारु मजुमदार काही वाचणार नव्हते व नावावर आक्षेपही घेणार नव्हते.

एकदा असंच एका गृहस्थांशी बोलता बोलता ते म्हणाले, 'मी तुम्हाला एका माणसाचा पत्ता देतो. तो फार helpful आहे. त्यांनी नाव लिहिलं–Shri MODAK इ. इ.' मी म्हटलं, 'अच्छा, मोडक म्हणजे महाराष्ट्रीय माणूस आहे तर !' यावर ते गृहस्थ म्हणाले, 'नाही. ते मोडक नाहीत. त्यांचं नाव आहे श्री. मोदक. 'मोडक' मराठी असतील, 'मोदक' हे बंगाली आडनाव आहे.' आणि नंतर त्या मोदकांच्या ओळखीचा प्रसंग आला तेव्हा गणपतीच्या हातातला मोदक डुलत डुलत आपल्या दिशेने येत असल्याचाच मला भास झाला अन् खूप हसू आलं.

अशीच श्रीकांतच्या लहानपणची गोष्ट. त्याला स्वतःचं नाव नीट सांगता येत नव्हतं. म्हणून त्याला फक्त 'श्री' म्हणायला शिकवलं. तुझं नाव काय म्हणून कुणी विचारलं की, तो म्हणायचा–'शिली !' (श्री) एकदा घरी आलेल्या एका पाहुण्याने त्याला 'ए सिली' म्हणून अगदी अभावितपणे हाक मारली. त्या गृहस्थांच्या लक्षात आलं नाही ते मला तत्काळ उमगलं. मी त्या क्षणापासून मुलाला श्रीकांत हे पूर्ण नाव सांगायलाच शिकवलं. (मोठेपणी तो 'सिली' समजला जायचा ही मला भीती वाटली.)

आता सांगा, नावात काय नाही ? *

## पुतळ्यांनो, आम्हाला क्षमा करा !

शहरात श्रेष्ठ व्यक्तींचे पुतळे असतात. असावेत, जरूर असावेत; पण एवढं खरं, त्या पुतळ्यांकडे सारखं लक्ष मात्र जात नाही लोकांचं ! अर्थात त्यात लोकांचा दोष आहे असंही नाही. कारण ते बिचारे आपल्याच कर्मकटकटीत व्यस्त असतात; पण कधी कधी हटकून ह्या पुतळ्यांकडं लक्ष वेधलंच जातं. उदाहरणार्थ, हावरा स्टेशनला जातायेता माझं तरी लक्ष टिळकांचा रुबाबदार पुतळा आकर्षून घेतोच आणि मग त्यांच्या त्या प्रसिद्ध वाक्याचा प्रतिध्वनी– '......आणि **तो मी मिळवणारच !**'– माझ्या मनात नकळत उमटून जातो. आता रोज काही मला हावरा स्टेशनवर जावं लागत नाही म्हणूनच कदाचित टिळकांच्या पुतळ्याकडे जेव्हा त्या बाजूला जाते तेव्हा माझं लक्ष वेधत असावं; पण नेहमी नेहमी 'रवींद्रसदन'च्या दिशेला जावं लागत असूनही रवींद्रांच्या पुतळ्याकडं का बरं लक्ष जावं ? त्याचं कारण वेगळं आहे. तो पुतळा रवींद्रनाथांचा वाटतच नाही इतका बेढब आहे. त्यातील अनेक दोष नजरेला इतके बोचतात की, हटकून तिकडं लक्ष जातं नि मनातून फार वाईट वाटतं. मन म्हणतं, एवढ्या श्रेष्ठ माणसाची प्रतिकृती इतकी कनिष्ठ दर्जाची का असावी ? प्रश्नाचं उत्तर सापडत नाही म्हणून मी जबरदस्तीने आपली नजर त्या पुतळ्यावरून काढून घेत असते.

मात्र पार्कस्ट्रीटच्या चौरस्त्यावर उभा राहणारा 'एकला चलो रे'च्या पोझमधला गांधीजींचा पुतळा इतका काही कलात्मक घडवलेला आहे की, मनोमन त्या कलाकाराला अनेकदा मी शाबासकी देऊन टाकीत असे; पण ह्या गांधीजींचं तोंड नेमकं पार्कस्ट्रीटच्या दिशेला– जिथे पार्क हॉटेल, इतर उच्चभ्रू रेस्टॉरंट आणि बार व चमकदार महागडी दुकानं यांचं कृत्रिम जग वास्तव्य करून आहे व जिथे परदेशी पाहुणे आणि खिशात जास्त पैसे खुळखुळणारी माणसेच फिरताना दिसतात ! त्या वेळी कधीकधी माझ्या मनात विचार यायचा की, ह्या पुतळ्यात एक दिवस खरे गांधीजी सजीव होऊन घुसले तर त्यांना काय वाटेल ?

पण आता तसा विचार यायचं कारण उरलं नाही; गांधीजींच्या पुतळ्याचं तिथून उच्चाटन झालं आहे. कलकत्ता ट्यूब रेल्वेचं काम चौरंगीपासून पार्कस्ट्रीटपर्यंत येताच त्यांच्या मार्गात आडव्या येणाऱ्या इतर वस्तूंप्रमाणे ह्या पुतळ्यालाही त्यांनी तत्काळ बाजूला सारलं. त्या वेळचं दृश्य बघायला काय विलक्षण गर्दी जमली होती ! गळ्यात दोरी अडकवून क्रेनच्या साह्याने तो पुतळा हलवला तेव्हा अक्षरशः अनेक अंतःकरणं पण हलली होती. आता त्या पुतळ्याला दुसरं

प्रतिष्ठित स्थान प्राप्त करून देण्यात आलं आहे ही एक समाधानाची गोष्ट होय.

ह्या जुन्या आठवणी आज होण्याचं कारण म्हणजे हाजरा पार्कातला जतीन दासचा पुतळा. वर्षानुवर्षे हा पुतळा स्थितप्रज्ञासारखा बसून होता. कलकत्ता ट्यूब रेल्वेच्या मार्गात त्याचा अडथळा निर्माण झाल्याबरोबर त्याचं उच्चाटन झालं. बिचारे जतीन दास...एके काळी खूप कर्तृत्व गाजवलं त्यांनी ! पण आज ते गळयात दोरीचा फास अडकवून कोण्या तरी ऑफिसच्या एका कोपऱ्यात अडगळ होऊन पडले आहेत. पहिले पाच-सहा दिवस तर पार्कातच अंग मोडून पडले होते ऊन, वारा सहन करीत ! मग एका ऑफिसरला वाटलं, न जाणो, पुढेमागे इथला पुतळा कुठे गेला म्हणून आरडाओरडा झाला तर आपल्याला जाब विचारण्यात येईल. म्हणून भीतीने त्यांनी तो फरफटत नेला नि ऑफिसमध्ये अडगळीच्या एका कोपऱ्यात पटकून दिला. त्यांच्या गळयात दोरीचा फास अजूनही तसाच अडकलेला आहे. तो काढून टाकण्याचं भान मात्र त्या ऑफिसरांना राहिलं नाही.

जतीनबाबू, तुमचं कर्तृत्व भक्कम असलं तरी गांधीजींएवढं खास नाही; म्हणूनच ही दुर्दशा तुमच्या पुतळ्याच्या वाट्याला आलीय् बरं ! परंतु ज्यांना तुमच्याबद्दल मनातून आदर वाटतो पण ते काही करू शकत नाहीत अशांना मात्र तुम्ही क्षमा करावी. आता तुमच्या पुतळ्याचं मनोगत ज्यांना ऐकूच येत नाही त्यांचा प्रश्नच नाही ! □

बिंदूकथा

# गरिबी वाईट असते

बिंदूसार

साहेबांचा बंगला मेनरोडवर आहे. येणारा-जाणारांची चांगली वर्दळ आहे. पांडुरंग चांभार बंगल्याच्या कंपौंडला लागून बसतो; पण आज तो सचिंत मुद्रेने रिकाम्या रस्त्याकडे भकासपणे बघत बसला आहे. ही जागा त्याला सोडून द्यावी लागणार आहे. सकाळी जाताना साहेबांनी त्याला अल्टिमेटम दिला आहे. त्याने येथे बसून बंगल्याचा शो बिघडवू नये. दुसरीकडे कोठेही बसावे. आजवर साहेबांच्या सांगण्याकडे दुर्लक्ष केले; पण आता मात्र हालावे लागणार. साहेबांचे म्हणणे ऐकले पाहिजे.

ही जागा सोडून दुसरीकडे बसले की, आधीचीच तुटपुंजी मिळकत कमी होणार. आता कसे करावे ? त्याच्याकडून चपला बनवून घेण्याचा काळ संपला आहे. नव्या प्लॅस्टिकच्या चपला शिवता येत नाहीत. खिळयाने सांधता येत नाहीत. लोक या चपला तुटल्या की, सरळ फेकून देतात. बाकी दुरुस्तीचे काम कमी झाले आहे. रुपयांमधली मिळकत पैशांवर आली आहे. घरात सगळी ओढाताण आहे.

साहेबांच्या बंगल्यामागे, अस्ताव्यस्त पसरलेल्या झोपडपट्टीत, एका झोपडीत पांडुरंग राहतो. तिथली बायामाणसे बंगल्यांमध्ये काम करतात. पुरुष बाहेर कुठे किरकोळ कामे करतात. आतापर्यंत दोन वेळा ही झोपडपट्टी उठविण्यासाठी सरकारी माणसे आली होती; पण कसे तरी प्रकरण मिटवले.

किती तरी वेळात कोणीही आलेले नाही. पांडुरंग विडी पेटवतो—समोरचा रस्ता न्याहाळतो. झोपडपट्टीतून कोठून तरी कर्कश्श आवाजात सकाळपासून सिनेमातील गाणी ऐकू येत आहेत. जवळजवळ रोजच लाउडस्पीकरवरून इथे गाणी लावली जातात. आताही गाणे चालू आहे. 'तू ले जिन्दगी का मजा-मजा-मजा' विडीचा कडक, कडवट धूर पांडुरंगची छाती जाळीत आहे.

कोणी तरी जंटलमन माणूस पाय ओढीत येतो. चप्पल पुढयात टाकून घाईघाईने म्हणतो,

'खिळे मारून दे रे दोन !' पांडुरंग चप्पल हाती घेतो. पाण्यात बुडवून खाली मान घालून काम सुरू करतो. जंटलमन सिगारेट ओढीत अस्वस्थपणे इकडे तिकडे पाहात उभा आहे. चप्पल सांधून पांडुरंग ती पुढे सारतो.

'किती रे पैसे ?'

'द्या साहेब आठ आणे !' पांडुरंग दूरवर कोठे तरी पाहत म्हणतो. आठ आणे जरा जास्तच होतात हे पांडुरंगला माहीत आहे; पण इलाज नाही.

जंटलमन विंचू चावल्यासारखा ओरडतो, 'आठ आणे ? एवढयाशा कामाचे ? अरे, काय आहे काय ?'

पांडुरंग हसण्याचा क्षीण प्रयत्न करीत म्हणतो,

'गरिबी वाईट असते साहेब !'

□

एका पायाला जरा घट्ट बसणारी, आत्ताच सांधून घेतलेली चप्पल पायात सरकवून जोशी लगबगीने पुढे निघतो. आपली काही तरी फसवणूक झालेली आहे असा भाव त्याच्या चेहऱ्यावर आहे. साहेब ऑफिसात नसताना, एक-दोन घरगुती कामे उरकण्यासाठी जोशी बाहेर पडलेला आहे; पण चपलेने दगा दिल्याने आता परत ऑफिसात जावे लागणार. साले फुकट आठ आणे गेले.

मुलीला कॉन्व्हेंटमध्ये अॅडमिशन मिळत नाही, त्यासाठी काही खटपट करावी म्हणून जोशी खरा एकाला भेटायला निघाला होता. आजही ते काम राहून जाणार. संध्याकाळी बायको चिडचिड करणार. तिला वाटते नवरा मुद्दामच काही खटपट करीत नाही. थोडेसे खरे आहे ते. फी आणि बस मिळून त्या शाळेचा खर्च महिना नव्वद रुपये येणार. जोशीला हा खर्च झेपणारा नाही; पण मुलीला कॉन्व्हेंटमध्ये घातलेच पाहिजे.

विमनस्कपणे जोशी ऑफिसात आपल्या जागी येऊन बसतो. पुढयातले कागद हाताने चाळतो. तेवढयात साहेबांचा निरोप घेऊन माने शिपाई येतो. जोशी खुर्चीवरून उठतो.

टेंबेसाहेब बाहेरून एका मीटिंगमधून वैतागून आलेले आहेत. जोशी आत शिरताच ते त्रासिक सुरात बोलतात, 'जोशी, तुम्ही प्रवासाचं भत्तेबिल असं काय केलं आहे ?'

'काय झालं साहेब ?' जोशी वेळ काढण्या-

साठी काही तरी विचारतो.

'पंचवीस रुपये जास्त लावलेयत तुम्ही– आय नो– तुम्ही कसे गेलात– केव्हा गेलात– कधी आलात ?'

जोशीच्या चेहऱ्यावर लाचारी व मुजोरी यांचे मिश्रण उमटते. तो खोटे खोटे हसत उत्तर देतो.

'साहेब, सगळेच या पद्धतीने बिलं करतात. आमचंच तेवढं तुमच्या डोळ्यांवर येतं. करून टाका ना पास !'

डोळ्यावरचा चष्मा काढून हातात घेत टेंबेसाहेब जोशीकडे न्याहाळून बघतात, 'जोशी, हे चूक आहे ! किती पगार मिळतो तुम्हाला ! तरी असल्या गोष्टी करता ?'

'कसला पगार साहेब– शेवटच्या आठवड्यात खिशात पैसा नसतो. हप्ते, विमा, फंड- किती काटछाट होते बघा ना साहेब !' जोशी समर्थन करतो.

साहेब आता या चर्चेला कंटाळले आहेत. 'अहो, या कटकटी नेहमीच्याच आहेत; पण म्हणून काय तुमच्यासारख्या सीनियर माणसांनी अशा प्रकारे वागायचं ? मग इतरांना काय बोलू शकणार आपण ?'

'गरिबी वाईट असते, साहेब.'

□

जोशी चेंबरच्या बाहेर पडल्यावर टेंबेसाहेब चष्मा जोरजोरात पुसतात आणि तो डोळ्यांवर चढवून समोरच्या फाइलीत डोकं घालतात; पण ते जे काही वाचत आहेत तिकडे त्यांचे लक्ष नाही. एका विचित्र प्रकरणानं त्यांचं मन व्यापून गेलं आहे.

कंपनीचे एक संचालक ठक्करसाहेब यांनी त्यांच्यासमोर एक पेच उभा केला आहे. एका नव्या उत्पादनाची सोल एजन्सी आपल्या पुतण्याला द्यावी म्हणून ते मागे लागले आहेत. कायद्यानुसार असे करता येत नाही, हे टेंबेसाहेबांना माहिती आहे, ठक्करनादेखील माहिती आहे; पण कायद्यात बसतील असे कागदपत्र करून हे काम करणे भाग आहे.

या प्रकरणाचा अर्धवट विचार करीत असताना व समोरचे कागद चाळून ट्रेमध्ये टाकीत असताना ऑफिसची वेळ संपते. टेंबेसाहेब मोठा आळस देऊन चष्मा काढून हातात घेतात. फोन वाजतो.

ठक्करसाहेब बोलतायत–

'काय टेंबेसाहेब, काय हालचाल ?'

'बस ठीक आहे आपल्या कृपेनं! आपल्या त्या नव्या एजन्सीचे काम कुठपर्यंत आलं टेंबेसाहेब ?'

टेंबे अस्वस्थपणे मानेवर हात फिरवीत म्हणतात, 'थोडी कॉम्प्लिकेशन्स आहेत साहेब! या प्रॉडक्टवर वर्षाचे कमिशन दोन लाख होईल. कंपनीनेच बेनामी एजन्सी काढावी असं अध्यक्ष म्हणताहेत.'

ठक्करसाहेब जोरात हसतात. 'अरे, अरे– असं करू नका यार ! कंपनीला काय कमी आहे ?'

'आपल्याला तरी काय कमी आहे ठक्करसाहेब ?' टेंबे विचारतात.

'गरिबी वाईट असते, साहेब !' हास्यकल्लोळात दोघेही फोन ठेवून देतात.

□

टेंबेसाहेबांची गाडी बंगल्यात शिरते तेव्हा बाईसाहेब फोनवर बोलत असतात. साहेब थकल्याप्रमाणे येऊन त्यांच्या शेजारी कोचावर टेकतात. टायची गाठ सैल करतात.

फोन ठेवून बाईसाहेब लगबगीने खानसाम्याला हाक मारतात.

'मला काही नकोय सुनीता.' साहेब कपाळावर हात फिरवीत सांगतात. शेजारच्या टीपॉयवरची बेन्सन अँड हेजेसची पेटी घेऊन सिगारेट शिलगावतात.

'काही विशेष ?' ते सवयीने प्रश्न विचारतात.

बाईसाहेबांच्या हातात एक पत्र आहे.

त्याची चाळवाचाळव करीत त्या हसत म्हणतात 'स्क्वॅश तरी घ्यावं थोडं !'

खानसाम्याला बोलावून त्या स्क्वॅश आणायला सांगतात आणि म्हणतात,

'विनायकचं पत्र आलंय. आता जम बसतोय त्याचा म्हणे; पण एक प्रॉब्लेम आहे.'

काय प्रॉब्लेम आहे हे टेंबेसाहेबांना चांगले ठाऊक असते. त्यांच्या बायकोचा भाऊ नेहमी कसला तरी धंदा काढून सारखे पैसे मागत असतो. ते जड स्वरात म्हणतात,

'सुनी, सध्या माझ्याजवळ काही रक्कम नाही आणि मागे पाच हजार दिले त्याचं काय झालं ?'

'अहो, असं काय करता ? नवी मशिनरी आणलीय त्यानं–आता धंद्यासाठी पैसे नकोत का ? आपले सगळे पैसे परत देणार आहे तो सहा महिन्यांत !' बाई गोड गोड हसत म्हणतात.

टेंबेसाहेब उत्तर देतात, 'पण सध्या तरी जरा अडचण आहे ! खरंच सुनी, एकदा सगळा खर्च चेक करायला हवा. मी घरात तीन हजार रुपये आणतो ते जातात कुठं ?'

बाईसाहेब विचारात पडतात. काही तरी सुचल्याप्रमाणे म्हणतात, 'मला तर काही कळत नाही बाई. या महागाईनं तर नको केलंय–कुठे जाणार आहे सगळं कळत नाही.'

टेंबेसाहेब गप्प बसतात. महागाईच्या चर्चेने त्यांना फार बोअर होते. आजच्या ठक्करसाहेबांच्या डीलमध्ये एक टक्का ठेवण्याचे त्यांनी ठरवले आहे. आणखी जरा ताणून धरले पाहिजे. दीड टक्कादेखील जमवता येईल. म्हणजे जवळजवळ थ्री थाउजंड झालेच. ते पाय लांब करीत म्हणतात,

'सुनी, ते स्क्वॅश राहू दे–परवाची ती डच बियर आण बघू !'

बाईसाहेब लगबगीने किचनमध्ये जातात. साहेब स्वतःच्या खोलीत जाऊन कपडे बदलतात आणि परत लाऊंजमध्ये दिवाणवर रेलून बसतात.

बियरचा मोठा घोट घेत बाईसाहेबांना विचारतात,

'सुनी, किती पैसे लागतील विनायकला?'

'काय बाई, दहा हजार लिहियेत त्यानं पत्रात.'

'असं कर ! त्याला लिही मर्कंटाइल बँकेकडे जायला. मी दोन–तीन दिवसांत फोन करीन.'

बाईसाहेब मान डोलावतात.

'खरंच सुनी, तो दाराजवळचा चांभार हालला की नाही ? मी येताना बघायचं विसरलो.'

'जाईल हो एक–दोन दिवसांत. तो तरी कुठे जाणार ? गरिबी वाईट असते !'

# शेतकरी उध्वस्त : निसर्ग उजाड : मुळशीतून फेरफटका

डॉ. अनिल गोरे

पुणे जिल्ह्याच्या तेरा तालुक्यांपैकी मागासपणात कोणाला हार न जाणारा तालुका म्हणजे मुळशी. डोंगर-कपारींच्या कुशीत वसलेला हा प्रदेश. नाव घेण्याजोगं एक गाव कुठे मिळणार नाही. मावळ तालुक्यात डोंगराळ भाग आहे; पण दुसरीकडे लोणावळा–तळेगाव आहेत. पिंपरी-चिंचवडही जवळच. शिरूर कोरडा ठणठणीत आणि कायमचा दुष्काळी; पण देशी व विदेशी संस्थांनी आणि सरकारांनी मदतीचा हात शिरूरबाबत कधी आखडता घेतला नाही. काही तालुक्यांना इतर काही नाही तर निदान पुढे होऊन कामे करून घेणारा पुढारी तरी लाभतो. मुळशीच्या पुढाऱ्यांना, मुळशीकरांच्या मते, फक्त कांदा–बटाटयाच्या युद्धात रस ! गावोगाव लोकांनी एकच कहाणी सांगितली की, कोणी मोठी आश्वासने देऊन गेले की भारी विलायती गवताचे बी आणून देतो, त्यातून तेलसुद्धा निघेल; पण बहुतेक ऑस्ट्रेलियन सरकारनेच बी पाठवण्यावर बंदी घातली असावी.

ग्रामीण भागाचे मागासलेपण जोखण्याच्या काही ढोबळ रीती आहेत. गावात वीज, शाळा, पिण्याचे बारमास पाणी, बारमास रस्ता, औषधाची सोय, गुदामाची सोय, सोसायटी यांपैकी कोणत्या गोष्टी आहेत ? मुळशीतल्या एकशेतीसच्या वर गावांपैकी अशा बहुतेक प्राथमिक सोई असलेली गावे हाताच्या बोटांवर मोजण्या इतकीच असतील.

वस्तुतः मुळशीच्याच दऱ्याखोऱ्यांमधून टाटांनी तलाव घडवला. शेतकऱ्यांना अक्षरशः बुडवले. त्या गोष्टीला आता जवळपास अर्धशतक लोटले; पण माणसे ते विसलेली नाहीत. सेनापती बापटांनी त्या वेळी शेतकऱ्यांना संघटित करून सत्याग्रह केले. जोरदार चळवळ चालवली. वर्षभर धरणाचे बांधकाम थंडावले. शेतकऱ्यांना वाटले फेरा गेला ! एका जोडप्याने कौतुकाने आपल्या पोराचे नाव ठेवले बापट. बापट मारुती पासलकर ! पण कुठे चक्रे फिरली कोणजाणे ! बांधकाम पुन्हा सुरू झाले. सत्याग्रह मात्र थंडावला. कोणी म्हणतात, की स्वतः गांधीजींनी सेनापति बापटांना सत्याग्रह मागे घेण्यास भाग पाडले. असेल ते असो. धरण बनले. गावे बुडाली. माणसे देशोधडीला लागली; पण पाण्यातून बनणारी वीज काही मुळशीकरांच्या वाटयाला आली नाही. आली ती फक्त उपेक्षा किंवा कुचेष्टा ! पौडाचा पाव्हणा म्हणून !

धरणग्रस्तांना दुसऱ्या गावठाणामध्ये नेऊन बसवले; पण ते तिथले झाले नाहीत. कोळवणात एका घरात भाकरी खाताना एका बारापंधरा वर्षांच्या पोरीला विचारले, या गावात उंबरा किती ? तिनं एक आकडा सांगितला. तिच्या मैत्रिणीने तो आकडा पंचवीस-तीसने वाढवला. तशी पहिली म्हणते, ती धरणाखाली गेलेल्यांची घरं. त्यांना आम्ही आमच्यात मोजीत नाही !

ही स्थिती पन्नास वर्षांनंतर ! आता नवे पासलकर धरण बनतंय वरसगावला, पानशेत शेजारी. दहा-पंधरा गावं येत्या दोन–तीन वर्षांत बुडायच्येत. सालाबादप्रमाणे बाबा आढाव या धरणग्रस्तांचे पुनर्वसन करा म्हणून आक्रंदन करतायत. दोन महिन्यांमागे सत्याग्रह झाला. सहाशे लोक, त्यात एक शेकडा बाईमाणूस, चार दिवस येरवडयाची हवा खाऊन आले. निष्पत्ती काय ? प्रश्नचिन्ह ! एका शेतकऱ्याने आम्हाला तळतळून सांगितले. बाबांनो, आमची गावे, आमची घरे, आमच्या जमिनी, आमचे देव तुम्ही बुडवणार म्हणता, बुडवा! त्यातून चांगले होणार असेल, तुमच्या शिवारांची तहान भागणार असेल, तर तसे होऊ द्या; पण मग आमच्याकडे जरा बघा की ! आम्ही काही सोन्याची कौले मागत नाही. भिजलेल्या वावराचा एक एक तुकडा आम्हाला द्या आणि गावठाण द्या; पण ते मात्र सगळयांना एकठाय द्या ! ताटातूट करू नका ! अधिकारी दौंडला कुठे जागा दाखवतात आणि म्हणतात निम्मी कुटुंबे इथे बसा. बाकीच्यांचे दुसरीकडे जमवू !

गावे बुडल्यानंतर उरणार कोण ? तर घाटमाथ्यावर रहाणारे गवळी धनगर. म्हशी–गाई पोसून दुधाचा धंदा करणारी ही छोटी जमात. पूर्वी कधी खालती खोल्यातल्या भातजमिनीचेही मालक असतील; पण आता डोंगरावर हाकलले गेलेले. गुराढोरांना वर पुरेसा चारा नाही, पाणी नाही. उन्हाळाभर जनावरे खंगत असतात. पहिल्या पावसात थंडीचा रट्टा बसला म्हणजे रुपयातली ४–६ आणे गुरे खपायचीच ! माथ्यावर वाऱ्यापासून तरी बचाव कुठला ? आणि पावसा–वाऱ्यांनी झोडल्यावर दाद कुणाकडे मागायची ? बरे, पावसाने नियमितपणा तरी सोडू नये; तसेही नाही. उन्हाळयात मधेच कधी तरी जोर धरतो. मातीतले गवताचे बी सगळे उगवून येते. मग पट्ठ्या दडून बसतो ! गवत फुलायच्या आधीच कोळपून जाते. असे सारखे झाल्यावर जमिनीत पुरेसे बी उरणार नाही; म्हणजेच चारा पुरेसा होणार नाही हे ओघाने आलेच !

चारा नाही तर झाडपाला तोडून खायला चालायचा; पण मुळशी भागातली झाडेच आता संपत आल्येत. धरणं झाली त्या वेळी धरणाखालच्या जमिनीवर एकही झाड ठेवायचे नव्हतेच. त्या निमित्ताने कंत्राटदार आणि झाडतोडयांची टोळधाड चालून आली. मग सक्तीने वा आमिष दाखवून अनेक पाण्याखाली न जाणारी रानेही त्यांनी कवडीमोलाने फस्त केली. त्या वेळी चार-दोन रुपयांकरिता ज्यांनी हिरडयासारखी झाडे विकून कोळसा करू दिला ते आज हिरडयाचा

चढता बाजार पाहून हळहळतात. जंगलचा कोळसा करण्याची प्रक्रिया आजमितीला चालू आहे. ट्रक जाण्याची सोय होण्यासारखी असली की कंत्राटदार आलाच! दळणवळणाच्या सोयीचा फायदा अंत्योदयाला होण्याऐवजी शोषकांना होतो, हा सार्वत्रिक नियम इथेही लागू होतो.

झाडे तोडून कोळशाच्या भट्ट्या लावण्याचे काम मुख्यतः कातकरी करत आहेत. कोळशाबरोबरच अन्य गावरान उत्पादनाच्या भट्ट्याही ते लावतात हे सर्वांना ठाऊक आहे. त्यामुळे आमची जीप रस्ता विचारण्याकरितासुद्धा कोठे थांबवलो की, एकदम पांगापांग होत असे. कातकऱ्यांनी केलेला कोळसा वाहून नेण्याचे काम लमाणांचे. पावसाळ्याच्या दिवसांत चाकणला आपल्या मुख्य ठाण्यावर राहायचे व एरवी रानोमाळ कामामागे फिरायचे, असा आम्हाला गुटक्याला भेटलेल्या लमाणांचा नियम. मग जंगलात कुठला धर्म आणि कुठला उत्सव! ज्या दिवशी कोणी आपल्या जातीचा भगत भेटेल तेव्हाच त्याच्या सोयीने देव करायचा. मग पोराबाळांना आंघोळी घालून चांगले कपडे चढवायचे. कोंबडे वगैरे कापायचे. पूजा करायची, भगताच्या अंगात आल्यावर तो सांगेल तसे करायचे. गंमत म्हणजे आम्ही आजूबाजूला आहोत ते सारे लमाणांची भाषा न जाणणारे हे लक्षात ठेवून, भगताच्या अंगात आलेली देवी मराठीत बोलती झाली.

कोळशापायी जंगले गेली, तसे जंगलातले प्राणीही! पूर्वी पट्टेवाला ढाण्या वाघ असे. त्याचा म्हशीला धोका फार. आता फक्त उरले ठिपकेवाले खरडे. ते कसले म्हशीवर चालून जाणार? मुळात म्हैस हे जनावर भित्रे नाही. अंगावर आलेल्याला शिंगावरच घेणार. धोका वाटला की, वछड्यांना मध्ये घेऊन भोवती म्हशी उभ्या राहतात, बाहेरच्या बाजूला शिंगे रोखून. शिवाय म्हशीचा बोजा फार. तो ढाण्यालाच झेपणारा. आता बिबट्या वासरे, कालवडी, बकऱ्या यांच्या मागावर असतो. गाय हे तसे भित्रे जनावर. कधी तोंड देणार नाही. पाठ दाखवून पळून जाणार. वजनाला कमी. म्हणून खायला कमी लागणार; पण अर्थात दूधही कमीच! धनगरांना चांगले दिवस होते तेव्हा घरटी पाच-पंचवीस म्हशी आणि तुरळक गाई असायच्या. राने चाऱ्याने भरलेली असायची. आता म्हशी फार घटल्या आहेत. उरल्यात त्या गाई. एखाद-दुसरा बोकड विकता येतो म्हणून माणूस शेळी पाळायचा. ती आपली भटकून पोट भागवते; पण घरातल्या कोंबड्या-बकऱ्यांपैकी पोटात फारच क्वचित. सगळे विकायचे. पूर्वी दूध विकायची सोय नव्हती. माणसे लोणी आणि तूप विकायची. ताक घरात खायची. आता शहरांची मागणी वाढल्यावर तेही संपले. हातात पैसे खेळायला लागले असतील थोडे फार; पण पोटचा घास नक्कीच गेला!

## टाटा कंपनी

वाटले होते, एवढी मोठी धरणे बनताहेत. मासे वाढतील. माणसे मासळी खातील; पण आहे उलटेच. टाटाच्या तलावात मासेमारी करायला बंदी आहे. का म्हणून? आमची जागा, इथलाच पाऊस. दोन्हींच्या मदतीने पाणी साठवून टाटा वीज करणार आणि मुंबईच्या डोंबल्यावर आदळणार! आम्हाला मात्र मासळीलाही महाग करून टाकणार! टाटा कंपनीसुद्धा खाकी डोक्यानेच चालते की काय? पण विचारणार कोणाला? मुळशीच्या टाटा गेस्ट हाउसमधल्या अधिकाऱ्याला काही तरी विचारायला गेलो तर असा वस्कन् अंगावर आला की वाटावे, याची पोरगीच पळवायला डाकू आले असणार.

पुऱ्या माहितीशिवाय टाटाच्या हेतूंविषयी शंका घेऊ नये असे मनाला बजावीत असतानाच सुसाळ्याच्या आणि लिंबारवाडीच्या मंडळींनी आणखी एक बाब नजरेला आणली. ज्या जमिनी स्वतःच्या मालकीच्या नाहीत त्या बव्हंशी टाटा हायड्रोकडून भाड्याने घेतल्या आहेत. भाडी नाममात्रच म्हणजे वर्षाला पाच-दहा रुपये वगैरे आहेत. बहुधा केवळ हक्क दाखवण्यापुरती असतील; पण करारनामा मात्र फक्त ११ महिन्यांचा. बाराव्या महिन्याला तोड. कॉलेजेसमध्ये ब्रेक देतात, घरमालक लीव्ह अॅन्ड लायसेन्सवर भाडेकरू बघतात. त्यात आणि ११ महिन्यांच्या करारात मला तरी फरक दिसत नाही; पण शहरात युनियन करून ब्रेक देण्याच्या प्रकाराला आळा घालण्यात आला, लीव्ह अॅन्ड लायसेन्स बेकायदा करण्यात आले, भाडेकरूला संरक्षण मिळाले. मग याच मंडळींनी टाटाच्या अंगठ्याखाली का राहावे? एक गोठा आणि घर एवढे बांधले तरी चार तुळया, चार खांब, पत्र्याची पाने, कौले, मजुरी यात काही हजार रुपये गुतणारच; पण अधिकार काही नाही. टाटा हाल म्हणाला की हालावेंच लागेल घरबिर टाकून. हे जाणूनच का काय, टाटावाले सीमेंटचा वापर करायला परवानगी देत नाहीत म्हणे. घराला नाही की विहिरीला नाही. मग एवढे रुपये खर्च करून विहीर खोदणार कोण? मनात आले, छोट्या शेतकऱ्याला धार्जिणे सरकार मुंबईला आहे तोवर ही टांगती तलवार बाजूला करता आली तर फार बरे होईल!

अर्थात मासेमारीला परवानगी मिळाली की प्रश्न सुटत नाहीत. असे खोल कृत्रिम तलाव हे गोड्या पाण्यातील माशांचे नैसर्गिक निवासस्थानच नव्हे. ते रहातात उथळ आणि वाहत्या पाण्यात. समुद्रातही कॉंटिनेन्टल शेल्फ या नावाने ओळखल्या जाणाऱ्या उथळ भागातच ते असतात. दुसरे म्हणजे या तलावात माशांना अंडी घालायला, विसावा घ्यायला जागा नाहीत. कडेला झाडे नाहीत, सर्वत्र धूप झालेली आणि उन्हाळ्यात पाणी कित्येक पुरुष खाली जाऊन किनाऱ्यावरच्या जागा उघड्या पडतात. म्हणून अशा थोड्या अनैसर्गिक वातावरणात वाढू शकणाऱ्या विशिष्ट जातींची मासळी तलावात सोडावी लागेल. त्या जातींना प्रजोत्पादन जमले नाही तर दर वर्षी हजारो पिल्ले बाहेरून विमानाने आणवावी लागतील. खाद्य निर्माण होण्याकरिताही काही कृत्रिम उपाय योजावे लागतील. बाब सोपी नाही; पण तज्ज्ञांच्या मदतीने प्रयत्न करण्याजोगी आहे. अनेक धरणांवर हा प्रयोग सरकार करत आहे. मुळशीत होईल का? पुढाऱ्यांनी जोर केला तर कदाचित होईल.

पुन्हा तीच मेख. वळण्याला जीपने चाललो होतो. रस्त्यात दहा-बारा माणसे काम करीत होती. वाटाड्या म्हणाला, हे तुमच्या रोजगारहमीचे काम. जिल्हा परिषदेच्या संदर्भात कोणी सांगितले होते की, मुळशीत रोजगारहमीचे पैसे पुरते खर्ची पडत नाहीत. परत जातात. त्यावरून मुद्दाम विचारले की, का हो, या भागात हमीच्या

कामावर माणसं येतात का? झटकन उत्तर आले, 'हे काय विचारणं! अहो, माणसं डोळे लावून बसल्यात. रोजगार भेटतोय का कुणाला?' मनाशी म्हटलं, कमाल आहे. योजनेचे पैसे आहेत. कामे आहेत. (ठाण्यातल्या जव्हार–मोखाडा भागात म्हणे, कामेच संपलीत. ऐकावे ते नवलच.) नुसती रस्त्याची कामेच किती तरी वर्षे पुरतील. काम करणारी माणसे चातकासारखी वाट बघतायत; पण तरी कामे फारच तुरळक निघतात. मग हे झारीतले शुक्राचार्य कोण? ऐकले की, पंचायत समितीच्या कोणा पदाधिकाऱ्यानेच कामे अडवलीत. का? तर रोजगारहमीची कामे रांगेला लागल्यावर पुढाऱ्यांच्या पुढ्यात लाळ घोटण्याची गरज कमी होते.

वळण्याच्या वरच्या अंगाला दोन देवाची बने आहेत. एक वाघजाईचे आणि दुसरे काळकाईचे. अर्ध्या पाऊण एकराचे हे तुकडे; पण इतके वेगळे, की कायम लक्षात रहावे. गर्द झाडी, उंच वृक्ष, आत उन्हाला शिरकाव नसल्यामुळे आलेला सुखद थंडावा. कोपऱ्यात एक ओबडधोबड वाटणारी देवता. या जमिनीच्या तुकड्यावरील झाडांची रक्षणकर्ती. देवांच्या नावाने सोडलेल्या या रानांना सहसा कोणी हात लावत नाही. लावला तर कोप होतो. अशा धार्मिक भावनेमुळेच मुळशीमध्ये आणि इतर मावळात किंबहुना संपूर्ण सह्याद्रीत जागोजाग असे माणसाने निकालात न काढलेले जंगलाचे ठिपके उरले आहेत. नुकतीच डोई केलेल्या भटाच्या घेऱ्याप्रमाणे दिसणारे. देवराई, देवाचे बन, देवरहाटी वगैरे नावांनी ओळखली जाणारी ही प्रथा कै. कोसांबींनी प्रथम उजेडात आणली. तिचा पद्धतशीर अभ्यास पुण्याच्या विज्ञानवर्धिनीचे वामनराव वर्तक आणि बंगलोरच्या टाटा इन्स्टिट्यूटचे माधवराव गाडगीळ गेली काही वर्षे करीत आहेत. मावळातला शेतकरी फार 'आधुनिक' होऊन देवराईवरची श्रद्धा गमावण्याआधीच या प्राचीन जंगलांच्या अवशेषांचे जतन करण्याची पक्की व्यवस्था होणे अगत्याचे आहे.

पाथरशेतला गेलो तेव्हा गावाचे वार्षिक वनभोजन चालले होते. भोजन आणि नंतर भजन. ज्यात जमले त्यात सामील झालो. देवळाबाहेर एक सरळसोट खांब उभा होता. हा कसला? बगाडाचा. चैत्री पौर्णिमेला गावोगावांतून बगाडे होतात. मानकऱ्याला हुकने टांगून गरगर फिरवणे वगैरे शहरी माणसाला अचंबा वाटतील असे विधी. शेकडो वर्षांपूर्वी कधी काळी नरबळीची प्रथा इथे असणे शक्य आहे असे मानसशास्त्रज्ञ म्हणतात. रेड्याला रिंगणात तलवार खुपसून पळवायचे व रक्तपात करून पाडायचे असा बळीचा प्रकार अगदी अलीकडेपर्यंत होता; पण आता सुधारणा झाली. मेलेला रेडा खायची पद्धत मागास मंडळींनी सोडली. गावकऱ्यांच्या खिशालाही विधी परवडत नसावा. एकूण तेही आता थांबले. तरीही अनिल अवचटांनी किर्लोस्कर मासिकात वर्णन केल्याप्रमाणे मांढरदेवीच्या जत्रेला शिसारी येईपर्यंत बकऱ्या आणि कोंबड्या मारल्या जातात; पण ती साताऱ्याची बाजू झाली.

### गवळी–धनगर परिषद

सुधारणांवरून आठवण झाली. कोळवणला बाजारात डोंगरगावचा आखाडा भेटला. गप्पा मारताना त्याने एक हँडबिल (हुंडेल) दाखवले. २२ एप्रिलला पाथरशेत मोशाच्या वर पडाळघाला गवळी-धनगरांची परिषद होणार. विषय–समाजाच्या अडचणी, अडाणी पद्धतींमध्ये सुधारणा. अचंबा वाटला. स्वतःच्या समाजातले उणेपण समजावून घेऊन दूर करायला माणसे जमताहेत आणि कुणाला त्याचा पत्ता नाही. ही पहिलीच परिषद नाही. अशा दर वर्षी परिषदा होत आहेत. ७२ सालच्या सभेचे हँडबिल मीच स्वतः नंतर पाहिले. म्हटले, जाऊन पहावे तरी काय चालले आहे ते.

परिषद बोलावण्यात पुढाकार सगू धाकू मरगळे यांचा. वय पस्तीसच्या आसपास. उंच, शिडशिडीत, चुणचुणीत, धारदार नाक, तरतरीत चेहरा. सामान्यतः गंभीर पण मधेच मनमोकळे हसू दाखवणारा. चार बुके शिक्षण, चंद्रमौळी घर, वावजाई दूध सोसायटीचा संस्थापक आणि गेली दहा वर्षे चेअरमन. इकडे मीरा सोसायटीजवळ दत्त रसवंती गृह म्हणून गुऱ्हाळ. सारखी धावपळ. त्यात ही परिषद घडवण्याची धडपड.

त्या गुऱ्हाळावरून दुधाच्या ट्रकने पहाटे निघालो. आत रिकाम्या कॅंडा, बर्फ, पानशेतच्या बाजाराला विकायला मंडईतून घेतलेली भाजी आणि आमच्यासारखे फुटकळ भटके. पानशेतनंतर फुफाटा सुरू झाला तो पार मोशे-पाथरशेतपर्यंत. तिथे पगार (दुधाची बिलं) वाटून झाल्यावर डोंगर चढत पाऊण तासात आमच्या घामाघूम स्वाऱ्या घुबाडीला म्हणजे सगूनी आणि दोन-तीन भाऊ यांच्या वस्तीवर. तिथे जरा विसावा घेऊन आणखी दीड तास तंगडेतोड केल्यावर पडाळघाला.


## तीन राजहंस प्रकाशने

**आणि ड्रॅगन जागा झाला**
अरुण साधू । चवदा रुपये

**फिडेल, चे आणि क्रांती**
अरुण साधू । सात रुपये

**पूर्णिया**
अनिल अवचट । सहा रुपये

**राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव, पुणे ४११ ०३०

दोन-तीन मोठे वृक्ष. फणस, आंबा असल्या तऱ्हेचे. त्या डेऱ्याखाली शे-दीडशे माणूस बसलेले. बाई औषधालाही नाही. नाणेमावळ, मोसेखोरे, कोंडूरखोरे, मुळशीधरण, कोळवण, आंधळ ते पार वेल्ह्यापर्यंतच्या भागातून आलेली माणसे. सगळ्या वयांची. कोणी टोपीवाले, कोणी पटकेवाले. पांगून पांगून बसलेले. विषय देज. आपल्या समाजात लग्नाकरता मुलीचा बाप जबर देज (हुंडा) घेतो. तो देतादेता मुलाचा बाप कर्जबाजारी होतो. हे मुलगी विकणेच झाले आणि आपल्याच हाताने मुलीला कर्जबाजारी घरात का लोटायची? देजचा खर्च परवडत नाही त्या गरिबाचे लग्नच होणार नाही काय?

ही तुटक तुटक प्रस्तावना झाल्यावर चर्चा. आपण आधी ठरवले होते की, देज जबर होऊ द्यायचा नाही. ७५० रुपये देज दिला तर मुलीकडून लग्न आणि ३५० दिला तर मुलगी फक्त उचलून न्यायची. तोच नियम पाळण्यात अजून गलती करतात आणि समाज काही शिस्त लावत नाही. तर आता संपूर्ण बंदी करण्यात काय गंमत आहे.

कोणाला लागणारा मुद्दा उपस्थित झाला की एकदम दोन-चारजण तावातावाने उत्तर देऊ लागत. मग एखादा तिसऱ्या कोपऱ्यातून ओरडे, एकेकाने बोला, एकेकाने बोला!


काहींना ग्रॅज्युॲलिझम मान्य नव्हता. घोंगड्याच्या वरती फक्त पाच रुपये द्यायला जरी परवानगी दिली तरी मग घोंगड्याखालती किती पैसा सारला जातोय हे समजणार नाही. आता एक आकडा मंजूर कराल आणि मग महागाईच्या नावाखाली वाढत वाढत तो आकडा पुन्हा गगनाला भिडेल.

मुख्य म्हणजे नियम तोडणाराला आपण काय करणार? एका चढा देज घेणाऱ्याला समजवायला एक गट गेला. तो कबूल होईना. शेवटी बालविवाहाच्या नावावर पोलिसपाटलाकडे त्याच्याविरुद्ध तक्रार केली तर भर बाजारात आयामाया काढायला लागला सगळ्यांच्या!

हो–ना करताना शेवटी देजबंदी ठराव मान्य झाला. ठिकठिकाणी अशा बैठका घेऊन त्याला सर्वांची संमती घ्यायची ठरले. पुढची बैठक ठरली १६ मेला– हडशीला.

मग वेल्ह्याच्या तुकारामबुवा कचऱ्यांनी वेगळाच मुद्दा काढला. आसामी बडी. सोसायटीचा चेअरमन, जिल्हा दूध फेडरेशनचा डायरेक्टर; पण पाय पक्के जमिनीवर. त्यांचे म्हणणे असे की, लग्न थोडक्यात व्हावं यासाठी धडपड करायची आणि मग लग्नानंतर माघारीण कुणी तरी फूस लावून पळवून न्यायची, याला काय अर्थ आहे? त्यांच्या शब्दात म्हणजे असल्या गांधर्व विवाहाविरुद्ध कारवाई झालीच पाहिजे; पण सूर्य कलायला लागला होता. पोटात कावळे कोकलत होते. शेवटी बैठक आटोपती घ्यावी लागली. जेवून तंगड्या तोडत पानशेतपर्यंत येताना डोक्यात चक्र तेच होते. सुखाचा संसार सोडून कोण शहाणी बाई पळून जाईल दुसऱ्याबरोबर? कोणी तरी मला समजावलं, मारहाण झाली तर वाटतं पळून जावंसं. मग प्रश्न खरा हा असेल का? का बरं बायकांना मारहाण होते? अहो, बायकांची जात, वावगं वागतीच! मग मात्र गप्पच बसलो.

□



## कुरुक्षेत्र केरळ । लेखांक दुसरा

विनय हर्डीकर । सतीश कामत

# मार्क्सवाद्यांच्या ऐन बालेकिल्ल्यात, तेलीचेरीत

१३ मेला सकाळी ९ च्या सुमाराला तेलीचेरीला पोचलो. कन्नोर जिल्ह्याचा तेलीचेरी हा सगळ्यात दक्षिणेचा तालुका. कन्नोर म्हणजे मलबार. त्यामुळे तेलीचेरी भागात मुस्लिमांची संख्याही फार मोठी आहे. त्या मानाने ख्रिश्चन कमी आहेत. गावाला अतिशय सुंदर समुद्रकिनारा लाभला आहे आणि समुद्रकिनारीच पूर्वीच्या नबाबाचा महाल अजूनही सुस्थितीत आहे. काही वस्ती समुद्र-काठाने आणि बाकीची वस्ती उंच-सखल भागात अशी तेलीचेरीची विभागणी आहे. या भागात मुख्यत: तीन प्रकारचे उद्योग चालतात. कौलांचे कारखाने, विड्यांचे कारखाने आणि हातमाग. असा तिन्ही प्रकारचा मजूरवर्ग या भागात मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे तेलीचेरी हा मार्क्सवाद्यांचा बालेकिल्ला समजला जातो.

नक्षलवाद्यांचा जेव्हा केरळात उठाव झाला त्या वेळी भारतभर गाजलेले 'अजिता–प्रकरण' तेलीचेरीतच घडले. अजिता या तरुण नक्षलवादी युवतीने तेलीचेरीच्या पोलिसठाण्यावर हल्ला केला व ती त्या भागाची एक legend च बनून गेली. नक्षलवाद्यांचा उठाव अल्पकालीन ठरला तरीही कम्युनिस्टांचे आणि विशेषत: मार्क्सवाद्यांचे प्राबल्य तेलीचेरीत कायमच राहिले. आलेप्पी जिल्ह्यातील तोरा-वोरूला केरळचे मॉस्को म्हणतात, तर तेलीचेरीला लेनिनग्राड सहज म्हणता येईल. इथल्या मार्क्सवाद्यांची वृत्ती, हा खास आपला वतनी भाग आहे अशीच होती व आहे इतर कोणत्याही पक्षाला त्यांनी तेलीचेरीत पाय रोवू दिला नाही. दंड व भेद यांचाच सतत अवलंब केला. मुसलमानांशी सामंजस्याचं धोरण ठेवलं. हिंदूंना दबावाखाली ठेवलं. म्हणूनच इथे संघाचं काम वेगानं वाढू लागलं. काही मंडळी मार्क्सवादी पक्ष सोडून संघात जाऊ लागली. काही घरात दोन्ही पक्षांचे लोक आहेत अशी परिस्थिती निर्माण झाली आणि संघर्षाची ठिणगी पडली.

केरळमध्ये १७ मेला विधानसभेच्या ज्या चार पोटनिवडणुका होणार होत्या, त्यांपैकी एक तेलीचेरीमध्येच होती. याव्यतिरिक्त कासारगोड या ठिकाणी मुख्य सामना दोन मुस्लिम लीगमध्ये होता. लीगवाल्यांचं भांडण हे या भागात काका-पुतण्याच्या भांडणासारखं आहे. दक्षिण केरळमध्ये दोन काँग्रेसमध्ये सामना होता आणि खुद्द तेलीचेरीमध्ये सी. पी. आय. आणि सी. पी. एम्. या दोन कम्युनिस्ट पक्षांमध्येच लढत लागली होती. थोडक्यात, पूर्वीचे काँग्रेस, मुस्लिम लीग आणि कम्युनिस्ट पक्ष हे अभंग पक्ष १९६० ते १९७० या दशकात फुटले होते आणि या निवडणुकीत या पक्षांतर्गत गटांमध्येच लढती लागल्या होत्या. एक मुस्लिम लीग दुसऱ्या मुस्लिम लीगला, एक काँग्रेस दुसऱ्या काँग्रेसला आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट उर्वरित कम्युनिस्ट पक्षाला पाडण्यात, त्यांचं राजकीय खच्चीकरण करण्यात रंगले होते. आपलं सर्वस्व पणाला लावून आपल्याच पक्षातला दुसरा गट नेस्तनाबूत करण्याचे डावपेच लढवत होते. कोणत्याही इतर पोटनिवडणुकीप्रमाणे याही पोटनिवडणुकीचा मुख्य भर सत्तारूढ आघाडीला पराभूत करण्यावरच होता.

तेलीचेरी हे गाव तसं लहान; पण सबंध गाव निळे–तांबडे झेंडे, पताका, बॅनर्स यांनी भरून गेलं होतं. रंगाऱ्याच्या ब्रशचा फटका न बसलेल्या भिंती शोधून काढणं मुश्कील होत होतं. या निवडणुकीचं आणखी एक वैशिष्टय जाणवलं. इथे प्रचाराचा बराचसा भर संगीतावर होता. लाउडस्पीकरवर गाणी म्हणत किंवा प्रचाराच्या गाण्यांचे टेप्स लावून ते वाजवत रिक्षा आणि मोटारी हिंडत होत्या. अर्थात मोटारीमध्ये 'कोरस'साठी तरुण व निरुद्योगी लोकांचाच भरणा अधिक असायचा. चौकाचौकात प्रचारसभा चालल्या होत्या. मल्याळी येत नसल्यामुळे पुढाऱ्यांच्या भाषणांमधले मुद्दे कुणाला तरी विचारल्याशिवाय फारसे कळायचे नाहीत; पण 'मार्क्सवादी' आणि 'आर. एस्. एस्.' हे शब्द वारंवार येत आहेत, एवढं मात्र कळायचं. कारण कोणताही वक्ता या मुद्द्याला स्पर्श केल्याशिवाय पुढे जाऊच शकायचा नाही. जागोजाग लावलेली पोस्टर्सही मनोरंजक होती. मागे एकदा तेलीचेरीमध्ये माध्यमिक शिक्षकांचा संप झाला होता. संपाचं नेतृत्व सी. पी. एम्. ने केलं होतं. या संपामध्ये भाग घ्यायला एका शिक्षिकेने नकार दिला. तेव्हा ती शाळेत जात असताना एका मार्क्सवादी कार्यकर्त्याने तिच्या अंगावर डांबर ओतलं होतं. एका पोस्टरमध्ये हीच घटना चित्रित करून मार्क्सवादी उमेदवाराला मत न देण्याविषयी विनंती केली होती. दुसऱ्या एका ठिकाणी पोस्टरचे तीन भाग केले होते. त्यातील पहिल्या भागात इंदिरा गांधी मॉयनिहानकडून पैसे घेत असल्याचं दाखवलं होतं. कारण त्या वेळी मॉयनिहानच्या 'A Dangerous Place' या खळबळजनक पुस्तकाची सर्वत्र चर्चा चालली होती. तेव्हा हे चित्र दाखवून इंदिरा काँग्रेसला मत न देण्याची विनंती केली होती. पोस्टरच्या दुसऱ्या भागात सध्याच्या आघाडी सरकारातील कम्युनिस्ट पक्षाचे मुख्यमंत्री पी. वासुदेवन नायर हे 'आम्ही संघावर बंदी घातली आहे' असे ओरडून सांगत होते आणि तिसऱ्या भागात एक पोलीस आउट पोस्ट दाखवलं होतं. नेहमीप्रमाणे तिथला पोलीस पेंगत होता आणि

शजारीच संघाची शाखा चालली होती. संघस्वयंसेवकांच्या हातात तलवारी दाखवण्याचीही कल्पकता चित्रकाराने दाखवली होती. या चित्राखाली 'कम्युनिस्ट उमेदवाराला मत देऊ नका!' अशी पुस्ती जोडण्यात आली होती. एका ठिकाणी नक्षलवाद्यांनी एक पोस्टर लावलं होतं. त्यावर लिहिलं होतं– 'राज्यकर्ते आपलं प्रभुत्व आणि लोकप्रियता सिद्ध करण्यासाठी आपल्या सोयीने निवडणुका घेतात. तेव्हा त्यांचा हा डाव हाणून पाडण्यासाठी मतदानच करू नका!'

तेलीचेरीच्या या निवडणुकीत मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षातर्फे एम. व्ही. राजगोपालन, तर सी. पी. आय. तर्फे श्रीधरन हे उमेदवार होते. संघ–जनसंघ–जनता पक्ष, इंदिरा-काँग्रेस, समाजवादी यांच्यातर्फे कोणीच उभे नव्हते. त्यामुळे या निवडणुकीत काहीही करून मार्क्सिस्ट उमेदवाराला पराभूत करायचं एवढंच अंत:स्थ उद्दिष्ट संघाने ठेवलं होतं. साहजिकच त्यांनी आपली मतं सी. पी. आय. च्या उमेदवाराला देण्याचं ठरवलं. संघाचा हा जुगार फसला आणि सी. पी. एम. चा उमेदवार मागल्या निवडणुकीपेक्षा थोडी जास्तच मतं मिळवून विजयी झाला; परंतु निकाल मार्क्सिस्टांच्या बाजूने लागल्यास ते चेकाळून पुन्हा हल्ले करायला सुरुवात करतील आणि पराभूत झाल्यास संतापून किंवा सूडभावनेने हल्ले करतील, या दोन्ही शक्यता सध्या तरी फोल ठरल्या आहेत. सध्या तरी ते बचावाच्या पवित्र्यात दिसतात.

## गीतारहस्य केरळात

अर्थात या सगळ्या घडामोडी अगदी अलीकडल्या म्हणजे गेल्या दीड दोन महिन्यांतल्या आहेत. त्याआधीच्या जवळजवळ दोन वर्षांत तेलीचेरी आणि आसपासच्या दहा मैलांच्या परिसरात संघ आणि मार्क्सवादी यांच्यामध्ये चांगल्याच चकमकी झडल्या. काही योजनाबद्ध, तर काही अचानक. दोन्ही बाजूंची माणसं मारली गेली. कित्येकजण जखमीही झाली. केव्हा कुणावर हल्ला होईल याची हमी देणं कठीण होतं. सर्वत्र संशयाचं आणि भीतीचं वातावरण पसरलेलं होतं. हेच सारं पाहण्यासाठी, प्रत्यक्ष पाहिलेल्यांकडून ऐकण्यासाठी आम्ही तेलीचेरीत दाखल झालो होतो. आम्हाला अॅडव्होकेट ए. डी. नायर यांचा पत्ता देण्यात आला होता. का कुणास ठाऊक, पण नावावरून उगीचच हा कुणी तरी प्रौढ, पन्नाशी उलटून गेलेला मनुष्य असावा, असं वाटलं होतं. त्यातून जनता पक्षाचे कन्नोर जिल्ह्याचे अध्यक्ष! पण प्रत्यक्षात एक पावणेसहा-सहा फूट उंचीचा तरुण मनुष्यच सामोरा आला. साधारणत: तिशी-पस्तिशीचा. जितका उंच तितकाच रुंद. भव्य कपाळ, मानेवर रुळणारे केस, व्यवस्थित राखलेली दाढी, कमरेला केरळी पद्धतीची लुंगी आणि अतिशय प्रसन्न हास्य! आणीबाणीच्या काळात ते सोळा महिने मिसाखाली तुरुंगात होते आणि तुरुंगात असताना त्यांनी गीतारहस्याचं मल्याळीमध्ये भाषांतर करण्याचा प्रयत्न केला. तसंच त्यांच्या कपाटात कायद्याच्या पुस्तकांपासून हॅरॉल्ड रॉबिन्सपर्यंत सर्व प्रकारची पुस्तके होती. आम्ही आमचा उद्देश सांगितला. कोचीनहून निघणाऱ्या 'जन्मभूमी' या दैनिकाचे संपादक श्री. पी. नारायणन यांचं पत्रही दिलं. नायरसाहेबांनी तावडतोब हालचालींना सुरुवात केली. खास केरळी पद्धतीच्या दडप्या पोह्यांचा नाश्ता करता करता तेलीचेरीतील एकंदर घटना, पोटनिवडणुकीतील पेच–डावपेच यांचा गोषवारा दिला. तोपर्यंत दोन कार्यकर्ते हजरदेखील झाले. तेलीचेरीमध्ये आमचा मुख्य भर चकमकींची माहिती गोळा करण्याबरोबरच प्रत्यक्ष घटनास्थळांची पाहणी करण्यावर, मृतांच्या नातेवाइकांना भेटून त्यांच्याशी या संबंधात बोलण्यावर होता.

## मेलूरमधील चकमक

नायरसाहेबांनी दिलेल्या कार्यकर्त्यांसह आम्ही तेलीचेरीहून सुमारे पाच मैलांवर असलेल्या मेलूर या ठिकाणी पोचलो. मेलूर हे लहानसं खेडेगाव–खरं तर लहानशी वस्तीच आहे. खास केरळी पद्धतीची अंतराअंतरावर बांधलेली घरं. पाऊस भरपूर असल्याने केरळात घरं उंचावर आणि रस्ते खोलात असतात. रस्त्याच्या दोन्हीकडे घरमालकांनी आपली जमीन धुपून जाऊ नये म्हणून बंदिस्त बांधकाम केलेलं असतं. शिवाय चढ, उतार, वळणं आणि रात्रीच्या वेळेला मिणमिणत्या दिव्यांचा उजेड यामुळे रस्ता अधिकच निर्मनुष्य वाटतो. आपल्याकडल्या गल्ल्यांसारखा निर्धास्त वाटत नाही. या मेलूरमध्ये २७ मार्चला संघ स्वयंसेवकांची मार्क्सवाद्यांशी चकमक झडली होती. साधारणत: रात्री नऊची वेळ असावी. सात-आठ संघ-स्वयंसेवक या भागातून चालले होते. मेलूर हा मार्क्सवाद्यांचा अगदी बालेकिल्ला समजला जातो. कारण या भागात मुख्यत्वे विडी-कामगार राहतात आणि त्यांच्या बहुतेक युनियन्स मार्क्सवादी कार्यकर्त्यांना बांधलेल्या आहेत. तेव्हा त्यांच्याच गल्लीतून जात असल्यामुळे एकदम दोनतीनशे लोकांचा एक जमाव या स्वयंसेवकांच्या मागे लागला. प्रथम दोन्ही गटांनी परस्परांवर दगडफेक केली. स्वयंसेवक संख्येने फारच थोडे असल्यामुळे हल्ल्याला फार काळ प्रत्युत्तर देणं त्यांना शक्यच नव्हतं. तेव्हा त्यांनी झटकन जवळच्याच एका घरात आश्रय घेतला. सुदैवाने ते एका स्वयंसेकाचंच घर होतं. त्या वेळी घरामध्ये त्या स्वयंसेवकाची म्हातारी आजी आणि दोन–तीन लहान मुलं एवढीच माणसं होती. एव्हाना हल्लेखोरांचा जमाव घराशी येऊन पोचला होता. स्वयंसेवकांनी घराचं दार लावून घेतलं ते धडका मारून उघडण्याचा प्रयत्न केला गेला; पण तो अयशस्वी ठरला. तेव्हा घरावर जोरदार दगडफेक सुरू झाली. तरीही स्वयंसेवक दाद देत नाहीत असं लक्षात आल्यावर ते कुठूनही निसटू नयेत म्हणून, घराच्या पोटमाळ्याचं छप्पर झावळ्यांनी शाकारलेलं होतं त्याला जमावाने आसपासच्या झावळ्या गोळा करून, त्या पेटवून त्यांच्या सहाय्याने आग लावून दिली. झावळ्या भराभर पेटू लागल्या आणि पाहता पाहता घराचं छप्पर पेटलं. आता स्वयंसेवकांना काही तरी हालचाल करणं भागच होतं. या घराला मागच्या बाजूला, डाव्या हाताला एक दार होतं; पण ते दर्शनी भागाकडून दिसू शकत नव्हतं. कारण एक सात-आठ फूट उंचीची भिंत पुढल्या बाजूला होती. स्वयंसेवकांनी याच दाराने निसटून जायचं ठरवलं; पण जाण्यापूर्वी बाहेरच्या हल्लेखोरांचं लक्ष दुसरीकडे वेधलं जावं, त्यांच्यामध्ये घबराट निर्माण व्हावी आणि दरम्यानच्या काळात पळून जायला पुरेसा अवधी मिळावा या उद्देशाने स्वयंसेवकांनी एक गावठी बॉंब (यालाच ते 'फटाका' म्हणतात) जमावाच्या दिशेने भिरकावला. या बॉंबमुळे नुसता गोंधळ, घबराटच उडाली नाही, तर एका मार्क्सवादी विडी-कामगाराच्या तो मर्मी बसून विडी-कामगार खाली कोसळला. तावडतोब त्याला घरापासून उजव्या हाताला वीस-पंचवीस फुटांवर नेण्यात आलं;

पण त्याचं तिथेच प्राणोत्क्रमण झालं! या सगळ्या गोंधळ–गडबडीचा फायदा घेऊन स्वयंसेवक, आजी व लहान मुलांसह मागल्या दाराने पसारही झाले. जमावानेही काढता पाय घेतला. कदाचित घरातून आणखी बाँब पडतील अशी भीती त्यांना वाटली असावी. पंचनाम्यामध्ये एकंदर वीस हजार रुपयांचं नुकसान झाल्याची नोंद करण्यात आली.

घर अजूनही उद्ध्वस्त अवस्थेतच होतं. छप्पर कोसळून पडलं होतं. कपडे, बगा, वायरिंग, फर्निचर इत्यादी गोष्टी अर्धवट किंवा पूर्ण जळलेल्या अवस्थेत दिसत होत्या. इतकंच नव्हे तर घराच्या भोवताली जी दोन-तीन नारळाची झाडं होती त्यांचे शेंडेही जळून गेलेले दिसले. घराच्या आसपास पडलेले दगड विशिष्ट आकाराचे आणि बाहेरून आणलेले स्पष्टपणे दिसत होते. त्यांचं वेगळेपण अगदी सहजपणे लक्षात येत होतं. हे दगड करड्या रंगाचे, मोठ्या आंब्याएवढे होते आणि केरळात सर्वत्र फक्त तांबडी माती आणि तांबडट रंगाचेच दगड सापडतात. काही दगडांना रक्तही लागलेलं होतं. बहुधा ते जखमी झालेल्या व नंतर लगेचच निधन पावलेल्या प्रकाशन या विडी-कामगाराचं असावं. घराच्या अंगणात उभं राहून हाक मारली तर सहज ऐकू जाईल इतक्या अंतरावर इथलं पोलिस आऊटपोस्ट आहे. सध्या संघाच्याच सहाय्यक समितीमधून आर्थिक मदत करून घर पुन्हा उभारलं जातंय.

## अमानुषतेचा बळी–चंद्रन

खरं म्हणजे संघाचा स्वयंसेवक यापूर्वीच म्हणजे १९६९ सालीच मारला गेला होता. त्यांचं नाव होतं रामकृष्णन. मध्यंतरीची पाचसात वर्षं थोडी शांतता, किरकोळ चकमकी यामध्ये गेली आणि २ सप्टंबर १९७८ रोजी चंद्रन हा संघाचा एक महत्त्वाचा कार्यकर्ता मारला गेला. त्याने कोणावर स्वतःहून हल्ला कधीच केला नाही. उलट अतिशय शांत, सज्जन, सुस्वभावी म्हणून तो सर्वत्र ओळखला जात असे. पाथरवटाचा हा मुलगा कॉलेजच्या पहिल्या वर्गाला होता. २ सप्टेंबरला चंद्रन नेहमीप्रमाणे संध्याकाळी शाखा घेत होता. त्या दिवशी दुर्दैवाने शाखेमध्ये दोन तरुण आणि पाच-सहा शिशू एवढीच माणसं होती. साधारणतः संध्याकाळी साडेसहाचा सुमार असेल. मार्क्सवाद्यांचा एक घोळका संघस्थानावर आला आणि त्यांनी वासु नावाच्या एका स्वयंसेवकाची चौकशी केली. त्या दिवशी वासु शाखेमध्ये आला नव्हता. चंद्रनने पुढे होऊन त्या लोकांना तसं सांगितलं आणि त्यांनी अचानकपणे चंद्रनलाच बडवायला सुरुवात केली. शाखेतील इतर स्वयंसेवक हतबुद्धच झाले. हल्लेखोरांनी चंद्रनला साधारणतः संघस्थानापासून पाच फूट खोल असलेल्या भाताच्या खाचरात ढकललं आणि पुन्हा बदम मारहाणीला सुरुवात केली. दरम्यान शिशूंपैकी एक जण धावत धावत घरी गेला आणि घरातला दंड घेऊन आला. या अवधीत चंद्रन मृतप्राय झाला होता. अंगावर एकोणीस वार झाले होते तरीही तोंडात शिट्टी तशीच होती! जेव्हा त्याने शवटचा श्वास तोंडावाटे सोडला तेव्हा तोंडातली शिट्टी जोरात वाजली व इतर लोक धावून आले; पण तोपर्यंत सर्व हल्लेखोर पसार झाले होते. हा सर्व कट चंद्रनच्या सावत्र आईच्या भावाच्या घरात शिजला असं म्हणतात. या प्रसंगानंतर एका स्वयंसेवकाने चंद्रनच्याच बहिणीशी विवाह केला.

चंद्रनचा खून झाला त्या संघस्थानावर आम्ही साधारण ज्या वेळी चंद्रनवर हल्ला झाला होता त्याच वेळी पोचलो. तिथंच भरणारी शाखा नुकतीच भरून गेली असावी किंवा चंद्रनच्या मृत्यूमुळे अनियमित झाली असावी. एक छोटा मुलगा तिथे भेटला. 'तू शाखेत जातोस का?' असं त्याला विचारताच 'चंद्रनला मारलं त्या दिवसापासून मी शाखेत येत नाही,' असं त्यानं उत्तर दिलं. एकीकडे हा परिणाम तर दुसरीकडे शेजारच्याच घरातून एक बालस्वयंसेवक लाठी घेऊन चंद्रनच्या मदतीसाठी धावून आला होता. चंद्रनविषयी बोलताना जिल्हा प्रचारक सनतकुमार, नायरवकील, विभागप्रचारक श्री. सेतुमाधव हे सगळेच अतिशय व्याकुळ होऊन बोलत असत. चंद्रनचं रक्त सांडलं ती जागा केरळातल्या इतर जागांसारखीच रम्य आहे. भाताची शेतं आहेत. त्यांच्या बांधांवर नारळाची झाडं आहेत. फणस आणि काजूच्या बागा आहेत. नुकताच पाऊस पडून गेल्यामुळे ज्या ठिकाणी चंद्रनचा मृत्यू झाला तिथं त्या वेळेसारखंच पाणी साचलं होतं. वर्षभरापूर्वी ते पाणी त्याच्या रक्तानं रंगलं असेल! हे संघस्थान ऐन मार्क्सिस्ट मोहल्ल्यात आहे, म्हणून आमच्याबरोबरचा कार्यकर्ता आम्हाला निघण्याची घाई करत होता. त्याला आमच्या सुरक्षिततेची काळजी असावी; परंतु तिथून पाय उचलणंही जड जात होतं.

चंद्रनचे वडील 'सीटू'चे कार्यकर्ते आहेत; पण या प्रकारानंतर त्यांनी संघासाठी काहीही करण्याची तयारी दाखवली आहे. आम्ही चंद्रनच्या घरी गेलो तेव्हा संध्याकाळचे सात वाजून गेले होते. घरापुढच्याच अंगणात खुर्च्या टाकून चंद्रनच्या वडिलांशी बोलत बसलो होतो. चंद्रनची सावत्र आई घरातून बाहेर आली. तिच्या हातात सुंदर पितळी टांगता दिवा होता. दिव्याला दोन ज्योती होत्या. तिने तो दिवा घराच्या दारात मधोमध टांगला. आम्ही सर्वजणांनी उभं राहून दिव्याला वंदन केलं. परतत असताना अनेक घरांच्या दाराला असे दिवे टांगलेले दिसले. रात्रीच्या अंधारात ते एकाच वेळी काही तरी गूढ आणि काही तरी सुंदर असे भासत होते चंद्रनची लहान भावंडं घराच्या दारात उभं राहून किती तरी वेळ आमच्या पाठमोऱ्या आकृत्यांकडे पाहत होती.

आणीबाणीनंतर काँग्रेसची सत्ता नष्ट झाल्यामुळे देशातल्या विविध राज्यांमध्ये काँग्रेसला गळती लागली. केरळही त्याला अपवाद नव्हतं. सत्ता गेल्यामुळं भयभीत झालेले काँग्रेसचे कार्यकर्ते भराभर सी. पी. एम. किंवा राष्ट्रीय स्वयंसेवक संघ या दोन संघटनांमध्ये घुसू लागले. वरकरणी हे फारच गमतशीर वाटतं; पण असं करण्यामागं काँग्रेसवाल्यांचा एकच हेतू होता. तो म्हणजे, यापैकी कोणत्याही संघटनेत त्यांना पुरेसं संरक्षण मिळणार होतं. कारण केरळमध्ये पाठीशी कोणती तरी शक्ती असल्याशिवाय टिकून राहता येत नाही, हे इथल्या प्रत्येक सुजाण माणसाने एव्हाना ओळखलं आहे. अशा तऱ्हेनं आणीबाणीत गैरवर्तन करणारे, अत्याचार करणारे जे काँग्रेसकार्यकर्ते सी. पी. एम. मध्ये आले ते मार्क्सिस्टांना परमपवित्र झाले. परंतु जे संघात आले ते मात्र या मार्क्सवाद्यांचे कट्टर शत्रू बनले. कारण त्यांनी आणीबाणीत गैरवर्तन करून एक पाप करून ठेवलं होतंच; पण नंतरही पापक्षालनार्थ सी. पी. एम. मध्ये न येता ते संघामध्ये गेले होते, हे तर अधिक भयंकर पाप झालं होतं. रवींद्रन हा संघाचा स्वयंसेवक याच मार्क्सिस्ट रोषाला बळी पडला.

रविंद्रन मूळचा काँग्रेसमधला; पण आणीबाणीतील संघाच्या कार्यामुळे प्रभावित होऊन त्याने १९७७ सालीच संघामध्ये प्रवेश केला होता. त्याचबरोबर मार्क्सवाद्यांना यशस्वीपणे तोंड देणारी संघ ही एकमेव संघटना आहे, असा विश्वास त्याला वाटायला लागला होता. अर्थातच रवींद्रनचं हे कृत्य मार्क्सवाद्यांना मानवणारं नव्हतं. त्यालाही एकटं गाठून ठार करण्यात आलं. आता रवींद्रनच्या मागं त्याची तरुण पत्नी आणि एक सहा वर्षांचा मुलगा आहे.

## बदललेला रवींद्रन

हा रवींद्रन संघात येण्यापूर्वी काही फार मोठा सज्जन, पापभीरू वगैरे नव्हता. समाजाच्या निम्न स्तरातल्या आणि हातात पैसे खेळणाऱ्या माणसाची प्रलोभनं त्यालाही होतीच. मातृसत्ताक पद्धतीप्रमाणे सासुरवाडीच्या घरी राहायला आलेला आणि थोडी-फार टगेगिरी करणारा हा काँग्रेस-कार्यकर्ता संघामध्ये येताच थोडासा पालटू लागला. त्याची व्यसनं कमी झाली. वर्तन सुधारलं. आपल्या गावासाठी काही तरी करायला हवं असंही त्याच्या मनानं घेतलं. त्याच्या गावी जायचं म्हणजे जवळजवळ तीन-साडेतीन मैल अंतर अत्यंत डोंगराळ, खडकाळ भागातून जावं लागतं आणि हा सगळा भाग मुस्लिम लाकूड-व्यापाऱ्यांनी व्यापला आहे. कदाचित त्यामुळेही रवींद्रन संघाकडे आला असेल. तो काम करत असलेल्या फॅक्टरीमध्ये रवींद्रनला जो गेल्या वर्षी बोनस मिळाला तो सगळा बोनस त्याने आपल्या गावी बस यावी म्हणून गावकऱ्यांना एकत्र करून रस्तादुरुस्तीसाठी खर्च केला. त्यामुळं त्याच्याबद्दल व संघाबद्दल कमालीची आत्मीयता आसपासच्या घरात निर्माण झाली होती. रवींद्रनची विधवा पत्नी म्हणजे कारुण्याची मूर्ती होती. तेथील संघाचे कार्यकर्ते तिच्या पुनर्विवाहाची खटपट करतीलच. केरळात स्त्रीचा पुनर्विवाह फारसा अवघड नसतो. त्याचप्रमाणे त्याच्या लहान मुलाच्या शिक्षणाचीही काही तरी चांगली सोय करण्याच्या विचारात ते आहेत. आम्ही गेलो तेव्हा रवींद्रनचा मेव्हणा घराची शेती वगैरे पाहण्यासाठी आला होता.

रवींद्रनला मार्क्सवाद्यांनी ठार केल्यानंतर अवघ्या तीनच तासांनी संघस्वयंसेवकांशी त्यांची आणखी एका ठिकाणी चकमक उडाली आणि तिच्यामध्ये पवित्रन हा मार्क्सवादी ठार झाला. या चकमकीपूर्वीच आणखीही एका ठिकाणी राजू मास्टर हा मार्क्सवादी कार्यकर्ता ठार झाला होता. दारू पिऊन शिवीगाळ हा त्याचा रोज संध्याकाळचा उद्योग. त्यातूनही शाखेत जाणाऱ्याला हटकणे, त्रास देणे यातही त्याचा पुढाकार असे. राजू मास्टरच्या बहिणीचाच मुलगा शाखेत जातो. त्यामुळे अधूनमधून त्यालाही प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष दमदाटी असायचीच. शेवटी कोंडलेल्या वाफेचा कुठून तरी निचरा होणं आवश्यक असतं आणि तसा तो होतो देखील.

चंद्रनच्या खुनानंतर जेमतेम दोनच महिन्यांनी म्हणजे २९ ऑक्टोबर रोजी दुपारी ४–४॥ वाजता पवित्रन या आणखी एका संघस्वयंसेवकाचा खून पडला. पवित्रनचा थोरला भाऊ सैन्यात आहे. त्याला हिंदी येत असल्याने त्याच्याशी बोलताना आम्हाला भाषेची अडचण आली नाही. तो एक महिन्याची रजा घेऊन बडोद्याहून केरळला आपल्या कुटुंबाला भेटण्यासाठी आला होता, आणि २९ तारखेलाच पुन्हा कामावर रुजू होण्यासाठी निघणार होता. पवित्रनचं एक छोटंसं दुकान होतं. त्यामुळे दुपारी ४–४॥ च्या सुमाराला एका परिचिताला दुकानात बसवून पवित्रन आपल्या भावाला भेटण्यासाठी घरी यायला निघाला. कारण एकदा भाऊ रजा संपवून गेल्यावर पुन्हा वर्षभर तरी भेट होणं शक्य नव्हतं. सायकलवर पवित्रन जात असताना वाटेत हिलयतुल्ला या एका अरुंद, निर्जन ठिकाणी त्याची सायकल ५०।६० जणांच्या जमावानं अडवली आणि त्याला खाली पाडून मारहाण करायला सुरुवात केली. तशाही परिस्थितीत पुन्हा उठून पवित्रनने पळायला सुरुवात केली. जमाव पाठलाग करू लागला. पवित्रननं जवळपासच्या घरात घुसण्याचा प्रयत्न केला; पण एव्हाना बहुतेक घरांची दारं–खिडक्या बंद झाली होती. एक दार उघडं होतं. पवित्रन झटकन आत शिरला; पण बाहेरच्या जमावानं ' तो चोर आहे त्याला घरात घेऊ नका ! ' असा ओरडा करायला सुरुवात केली. घरामध्ये फक्त स्त्रियाच होत्या. तेव्हा त्यांनी पवित्रनला बाहेर हाकललं. रक्तानं माखलेला पवित्रन पुन्हा जमावाच्या हातात सापडला. तरीदेखील त्याने पळण्याचा प्रयत्न केला; पण एक दगड अगदी वर्मीच लागला आणि पवित्रन खाली कोसळला. अर्धवट बेशुद्धावस्थेत तो सारखं पाणी मागत होता; पण जमावानं कुणाला त्याच्यापर्यंत पोचूच दिलं नाही. थोड्याच वेळात पवित्रन गतप्राण झाला !

पवित्रनचा मामा मार्क्सवादी आहे. या हल्ल्याची संपूर्ण योजना त्याच्याच घरात तयार झाली. तसेच पवित्रन मृत्यू पावल्यावर त्याला मारणाऱ्या मारेकऱ्यांना या मामानं स्वतःच्या घरात दडवून ठेवलं. पवित्रनचं अंत्यदर्शन घ्यायला येण्याचीसुद्धा तसदी त्यानं घेतली नाही. नंतर या भागात १४४ कलम जारी करण्यात आलं. अतिशय कडक बंदोबस्तात पवित्रनची अंत्ययात्रा निघाली. आता पवित्रनच्या घरी आई, चार भाऊ आणि तीन बहिणी असा परिवार आहे. घराच्या मागल्याच बाजूला, सुमारे शंभर फुटांवर पवित्रन चिरविश्रांती घेत पहुडला आहे.

## ' शांतता परिषद '–जस्ट फॉर अ चेंज

दोन्ही बाजूंनी इतकी खूनखराबी झाल्यावर मार्क्सवादी आणि संघाच्या नेत्यांची एक ' शांतता परिषद ' झाली. मार्क्सवादी मंडळी याबाबतीत जरा अदूरदर्शीपणाने वागली असं वाटतं. इतरत्र मार्क्सवाद्यांचा दृष्टिकोन सध्या दम खाण्याचा आहे. दिल्लीत, महाराष्ट्रात, एवढंच काय बंगालमध्येसुद्धा केवळ शक्तीचे प्रदर्शन ते हल्ली करत नाहीत व राजकीय परिस्थिती काळजीपूर्वक पाहतात. केरळात मात्र संघाचा प्रश्न त्यांनी धसमुसळेपणानं हाताळला. आत्तापर्यंतचे हल्ले जसे पचून गेले तसा हाही पचून जाईल आणि संघवाले माघार घेतील असा त्यांचा हिशोब असावा. त्यामुळे प्रथम शांततासमितीची बोलणी सुरू होताच त्यांनी कानांवर हात ठेवले. संघवाल्यांचा आत्मविश्वास दोन कारणांनी वाढला होता. एक म्हणजे केरळमध्ये झगडत झगडतच ते वर आले आहेत आणि दुसरं असं की, आणीबाणीच्या काळात मार्क्सवाद्यांनी जेव्हा काहीही केलं नाही तेव्हा संघाच्या स्वयंसेवकांनी सत्याग्रह केले; पोलिसांचा बेदम मार खाल्ला आणि मुळातच टणक असलेले हे थिय्या, कोळी, कामगार स्वयंसेवक अधिकच टणक बनले. त्यामुळे त्यांचीही प्रतिक्रिया तीव्र उमटली. विडी–कामगार घोळक्याने काम करत असल्याने जसा

मार्क्सवाद्यांचा फायदा होतो तसा यांचाही होतो. बऱ्याच जणांना एकदमच बदडता येतं. म्हणून एवढी तीव्र प्रतिक्रिया उमटल्यावर मार्क्सवाद्यांना लोकशाही, कायदा, शांतता, धर्मनिरपेक्षता, व्यक्ति-स्वातंत्र्य या सर्व गोष्टींची आठवण झाली.

इथून पुढे दोघांनीही परस्परांवर हल्ले करू नयेत, एखाद्या ठिकाणी काही अनुचित प्रकार घडलाच तर स्थानिक नेत्यांनी तो तिथेच मिटवावा, त्यांचे लोण इतरत्र पसरू देऊ नये अशी तत्त्वंही दोन्ही बाजूंकडून मान्य करण्यात आली. दोन महिने शांततेत गेले; पण वातावरण संशयाचंच होतं. शेवटी ठिणगी पडलीच. हल्ले–प्रति-हल्ले सुरू झाले. २१ मार्च रोजी संघाच्या विजयन या खंडकार्य-वाहावर हल्ला झाला. विजयनच्या घरी हातमागाचा व्यवसाय चालतो. या व्यवसायासाठी जे सुताचे गुंडे लागतात ते एका विशिष्ट दुकानात पोचवायची जबाबदारी त्या दिवशी विजयनवर होती. त्यामुळे तो दुपारी दुकानावर गेला. दुकानातून गुंडे देऊन बाहेर पडता पडताच विजयनवर हल्ला झाला. त्याला प्रतिकाराची फारशी संधीदेखील मिळाली नाही. पोलिसचौकीपासून अवघ्या ५० मीटरवर हा प्रकार भर दुपारी हमरस्त्यावर घडला; पण पोलिसांना घटना-स्थळी पोचायला अर्धा तास लागला ! तोपर्यंत हल्लेखोर कार्यभाग साधून पसारही झाले होते ! आता विजयनचा एक भाऊ हातमाग चालवतो आणि दुसरा स्वयंसेवक असलेला भाऊ मार्क्सवाद्यांवरील हल्ल्याच्या प्रकरणी मॅजिस्ट्रेट कस्टडीत आहे.

## तटस्थ पोलीस

असे हल्ले होत असताना केरळ सरकारचे पोलीस काय करतात असा प्रश्न साहजिकच पडेल. साधारणपणे पोलिसपार्टी ही माण-साचा मुडदा पडल्यावर तीन तासांनीच येते. पवित्रन मारला गेला त्या ठिकाणापासून हाकेच्या अंतरावर दोन पोलिसठाणी आहेत. कारण पाँडिचेरी या केंद्रशासित प्रदेशाचा भाग आणि तेलीचेरी तालुका या दोन्हीची सरहद्द या इलहतुल्ला भागातच आहे. म्हणजे दोन पोलिसठाण्यांचे पोलीस या प्रकाराकडे तटस्थपणे पाहात होते. पवित्रनचा प्राण गेला, हल्ला करणाऱ्यांचा जमाव निघून गला आणि अंत्ययात्रेला मात्र पोलीस मोठ्या हुरुपाने पुढे सरसावले. कुंपणच बाजूला होऊन शेतात चोराला घुसू देतं ते असं ! कारण जोपर्यंत संघवादी आणि मार्क्सवादी परस्परात लढून मरताहेत तोपर्यंत वासुदेवन नायर आणि मंडळींना कायदा आणि सुव्यवस्था यांचे फारसे सोयर-सुतक बाळगण्याचं कारण तरी काय ?

दरम्यान अन्य काही ठिकाणी झालेल्या चकमकींमध्ये अली राधाकृष्णन–चंद्रनला मारण्यात याचा प्रमुख हात होता–के. व्ही. बालन, टी. बालन, पी. बालन आणि दामोदरन हे मार्क्सवादीही मारले गेले. कुन्हीरामन नायर या पंचावन्न वर्षांच्या कारकुनाची मार्क्सवाद्यांनी हत्या केली !

या सर्व चकमकी तेलीचेरी आणि आसपासच्या दहा मैलांच्या परिसरातच घडल्या. 'द हिंदू' या दक्षिण भारतातील सुप्रसिद्ध दैनिकाचा कालिकत येथील वार्ताहर लिहितो–

'संघाचे लोक हल्ला करताना मार्क्सवाद्यांव्यतिरिक्त कोणीही जखमीसुद्धा होणार नाही, याची पुरेपूर खबरदारी घेतात. तसंच ते मार्क्सवाद्यांच्याच बालेकिल्ल्यामध्ये गटागटाने शिरून गटागटांवर हल्ले करतात. याउलट मार्क्सिस्ट लोक त्यांच्या भागात संघाचा स्वयंसेवक एकटादुकटा सापडला तरच हल्ला करतात. त्याचप्रमाणे संघाशी दुरूनही संबंध असलेल्यांनादेखील ते त्रास देतात.'

या सर्व घटनांमध्ये मार्क्सवाद्यांचं मुख्य धोरण जुन्या संघशाखा बंद पाडणं आणि नव्या सुरू होऊ नयेत म्हणून दमबाजी, मारहाण, खून याद्वारा दहशत निर्माण करणं असं आहे. याचबरोबर मुस्लि-मांनीही या संघर्षात पडावं म्हणून मार्क्सवाद्यांनी पुष्कळ प्रयत्न केले. कॅननोर जिल्ह्यात व आसपासच्या भागात प्रचारसभादेखील घेतल्या; पण संघाला पाठिंबा दिला तर आपण एकाकी पडू, या भीतीने संघावर टीकेची झोड उठवली जाते. तसंच स्वतःवर पुरोगामित्वाचा शिक्का मारून घेण्याची ही संधी गमवायला कोणी फारसं राजी नसतं. संघस्वयंसेवकांवर हल्ले करण्याच्या दृष्टीनं विडी-कामगार मार्क्सवाद्यांना फार उपयोगी पडतात. कारण या वर्गावर मार्क्सवाद्यांची चांगलीच पकड आहे. त्यामुळं नियोजित हल्ल्यापूर्वी थोडा वेळ आधी या विड्या वळत बसलेल्या कामगारांना हाक दिली जाते, हल्ला केला जातो, काम फत्ते झाल्यावर कामगार पुन्हा शांतपणे विड्या वळायला बसतात. त्यामुळे अतिशय थोड्या वेळात मार्क्सवाद्यांना 'सैन्या' ची जमवाजमव करता येते.

संघवाल्यांनीही या संघर्षाला जातीय दंगलीचे स्वरूप येऊ नये म्हणून मुस्लिम मार्क्सिस्टांना अजिबात हात लावलेला नाही. त्या-मुळं मुस्लिमही तटस्थ आहेत. सध्याच्या आघाडी सरकारातील शिक्षणमंत्री, मुस्लिम लीगचे नेते श्री. सी. एच. महंमद कोया यांनी ही गोष्ट अतिशय अभिमानाने सांगितली.

या सबंध परिसरातले संघाचे बहुतेक स्वयंसेवक सामाजिकदृष्ट्या तळच्या स्तरातील, मागासवर्गीय असे आहेत. बहुतेकजण तेली-चेरीच्या आसपास पसरलेल्या लहान लहान खेड्यांमधून-वस्त्यांमधून राहतात. कित्येकांच्या घरात वीज नाही, वडील मोलमजुरी करणारे, पाच-सहा भावंडं अशी परिस्थिती आहे. आमच्याबरोबर दिवसाला दहा-दहा मैल चालणाऱ्या या स्वयंसेवकांपैकी काही जणांच्या पायांत चपला देखील नव्हत्या आणि हे स्वयंसेवक मुख्य शिक्षक, कार्यवाह अशा अधिकारी स्तरावरचे होते !

## दहशतीला आव्हान

या परिसरातली घरंही तशी अंतराअंतरावर, एकमेकांपासून पूर्णपणे अलग पडलेली अशी दिसतात. रस्ते अतिशय अरुंद आहेत. कित्येक ठिकाणी तर दाट झाडीमधून जाणाऱ्या फक्त पायवाटा आहेत. त्यामुळं साहजिकच हल्ले करायला आणि हल्ले करून पसार व्हायला आडोसेही भरपूर. संध्याकाळच्या वेळी रस्त्यावर माणूस नजरेलासुद्धा पडत नाही. पोलिसचौक्याही लांब लांब अंतरावर. कित्येक ठिकाणी तर चकमक झाल्यावर, खून पडल्यावर पोलिस-चौक्या उभारल्या जातायत; पण आता त्यांची आवश्यकता संपलेली असते. बहुतेक ठिकाणी असे काही प्रकार घडल्यावर पोलिसखात्याने कमालीचा थंडपणाच दाखवला आहे. मार्क्सवाद्यांच्या भीतीनं सी. पी. आय. वालेसुद्धा या भागामध्ये जायला घाबरत असत. प्रथम संघानंच इथं बैठकी घ्यायला सुरुवात केली आणि नंतरसुद्धा

संघवाल्यांचं संरक्षण घेऊनच सी. पी. आय. वाले या भागामध्ये त्यांच्या बैठकी घेऊ लागले. हा प्रदेश म्हणजे मार्क्सवाद्यांचा बालेकिल्ला आहे आणि त्यांनी सर्वत्र स्वतःबद्दल एक दहशत बसवून ठेवली आहे. दहशत इतकी की, एका आय. काँग्रेसच्या पुढाऱ्याने, मार्क्सवाद्यांनी गेल्या दहा वर्षांत शंभर तरी खून केले, असं विधान केलं. अर्थात असे खून कधीच सिद्ध होत नसतात. या दहशतीला पहिलं आव्हान राष्ट्रीय स्वयंसेवक संघानं दिलं आहे.

केरळमध्ये बऱ्याच कुटुंबांमध्ये असं एक चित्र दिसलं की, मुलगा संघाचा स्वयंसेवक आणि वडील मात्र कट्टर मार्क्सवादी आहेत किंवा दोन भावांपैकी थोरला भाऊ मार्क्सवादी आहे, तर धाकटा भाऊ संघाचा प्रचारक आहे. काही कुटुंबांमध्ये मात्र तिघेही भाऊ स्वयंसेवक आहेत. म्हणजेच संघवादी आणि मार्क्सवादी हा झगडा अगदी कुटुंबाच्या पातळीवर जाऊन पोचला आहे.

### व्यसने, मित्रपरीक्षा ....

या चकमकींमध्ये संघाचे जे स्वयंसेवक मृत्यूमुखी पडले आहेत किंवा कायमचे अपंग झाले आहेत त्यांच्याकरता संघाने मदतकार्यही त्वरित सुरू केलं आहे. मेलूरचं उद्ध्वस्त झालेलं घरही पुन्हा उभं राहू लागलंय. संघानं मदतीचं जे आवाहन केलं होतं त्याला प्रतिसादही चांगला मिळाला आहे. संघाचं हे आवाहन पुढीलप्रमाणे आहे—

प्रिय बंधूंनो,

संघाचे केरळमधील आणि विशेषतः तेलीचेरी भागातील स्वयंसेवक आज मार्क्सिस्टांच्या संघशाखांवरील आणि स्वयंसेवकांवरील हल्ल्यांना अतिशय धैर्याने तोंड देत आहेत, हे सर्वांना माहीत आहेच. गेल्या सहा महिन्यात संघाचे सहा स्वयंसेवक मृत्युमुखी पडले आहेत आणि सुमारे अर्धा डझन घरं उद्ध्वस्त करण्यात आली आहेत. या भागातील संघाचं कार्य निपटून काढण्याकरिता मार्क्सवाद्यांनी सर्वत्र दहशतीचं वातावरण आज निर्माण केलं आहे, असं जर म्हटलं तर त्यात काही वावगं होणार नाही. आम्ही न्याय आणि सुरक्षिततेकरता धाव घेतल्यानंतर सरकार आणि पोलिसखातं या दोघांनीही अतिशय थंड धोरण स्वीकारलं आहे आणि कित्येक निष्पाप संघस्वयंसेवकांवर फौजदारी खटले भरण्यात आले आहेत. तरीदेखील स्वयंसेवक अतिशय धैर्याने या अत्याचारांना तोंड देत आहेत आणि कोणत्याही परिस्थितीत संघाचं कार्य अखंडितपणे चालू ठेवण्याचा निर्धार त्यांनी केलेला आहे. हळूहळू पण निश्चितपणे या परिस्थितीमध्ये स्वयंसेवक बदल घडवत आहेत.

'त्याच वेळी मृत स्वयंसेवकांची निराधार मुलं, आर्थिकदृष्ट्या त्यांच्यावर अवलंबून असणारी कुटुंबं यांना आर्थिक मदत, ज्या स्वयंसेवकांवर गुन्हेगारी स्वरूपाचे खटले भरण्यात आले आहेत त्यांना लागणारी कायदेशीर मदत, जखमी स्वयंसेवकांना उत्कृष्ट वैद्यकीय सेवा, उद्ध्वस्त घरांची पुन्हा उभारणी इत्यादी कामं संघानं चालू केली आहेत; पण या सर्व बाबींसाठी फार मोठी आर्थिक मदत आवश्यक आहे. तेव्हा या समस्येनं अतिशय भीषण स्वरूप धारण केलं आहे हे लक्षात घेता आम्ही संघाच्या कार्यकर्त्यांनी आणि संघाबद्दल सहानुभूती असणाऱ्यांनी मिळून ही मदत उभी करण्यासाठी एक समिती नेमली आहे आणि फक्त केरळातीलच नव्हे, तर देशाच्या इतरही भागांमधील राष्ट्रप्रेमी नागरिकांनी या मदतनिधीला सहाय्य करावं, असं आवाहन आम्ही करत आहोत.

'तुमचं सहाय्य आणि नैतिक पाठिंबा या निराश्रितांचं पुनर्वसन करण्यासाठी, त्यांचे अश्रू पुसून टाकण्यासाठी आणि राष्ट्रीय उद्दिष्टांच्या या लढ्यात सबंध देश केरळातील स्वयंसेवकांच्या पाठीशी उभा आहे अशी भावना निर्माण करण्यासाठी निश्चितच उपयुक्त ठरेल!

कृपया पुढील पत्त्यावर सढळ हाताने मदत पाठवावी. श्री. के. व्ही. आनंदन, हॅन्डलूम सिंडिकेट, परक्कन्डी, कन्नोर-६७०००१.'

या समितीचं नावच 'तेलीचेरी संघर्ष दुरित निवारण समिती' असं ठेवण्यात आलं आहे आणि तिच्या या आवाहनाला प्रतिसादही उत्तम मिळत आहे. मिळणाऱ्या मदतीतून ताबडतोब आवश्यक ठिकाणी सामग्रीचं वाटप होत आहे. त्यामुळंच तेलीचेरीच्या सब-जेलमध्ये असलेल्या स्वयंसेवकांना आम्ही जेव्हा भेटायला गेलो तेव्हा त्यांच्या चेहऱ्यांवर, आपल्याला या केसेसमधून आपले कार्यकर्ते निश्चित सोडवतील असा एक विश्वास दिसून आला. त्यांचे कुटुंबीयदेखील याबाबतीत अत्यंत निर्धास्त वाटले. तेलीचेरीचा जेलरसाहेब स्वयंसेवकांच्या शिस्तबद्ध वर्तनावर निहायत खूष होता. तुरुंगामध्ये अशा प्रकारच्या कैद्यांचा अनुभव त्यालाही नवीनच होता. त्यामुळे संघस्वयंसेवकांची तो अगदी तोंड भरून स्तुती करत होता. आमच्याबरोबरच्या प्रचारकाच्या अंगावर रोमांच फुलत होते.

चंद्रन, पवित्रन, रवींद्रन सगळ्यांची घरं पाहिली. सगळे अत्यंत गरीब परिस्थितीतले लोक. हरीहरन नावाचा एक कार्यकर्ता मारला गेला; एक जखमी झाला. जखमी हरीहरनच्या घरी गेलो होतो. अतिशय गरीब परिस्थिती असूनही घर स्वच्छ होतं, सुंदर होतं, घराभोवती बाग होती. घरात आम्हाला द्यायला काहीच नव्हतं. हरीहरनच्या बहिणींनी ग्लासभर पाण्यात चमचा-चमचा साखर घालून आणून दिलं. भाषेची अडचण तर होतीच; पण मृतांच्या आप्तांशी काय बोलायचं हा प्रश्न काही भाषा येऊन सुटणारा नव्हता. जे कोणी मार्क्सवादी मारले गेले त्यांच्याही घरी असंच दुःखाचं वातावरण असेल. प्रयत्न करूनही निवडणुकीच्या गदारोळामध्ये त्यांच्यापैकी कुणाला भेटता आलं नाही. दररोज हिंडून परत आल्यावर रात्री झोपताना मनात विचार येत, असे— या अशिक्षित, अर्धशिक्षित हुतात्म्यांना आपण कशासाठी मेलो हे कळलं असेल का? दोन्ही बाजूंच्या हुतात्म्यांच्या कुटुंबियांना देशभरातून माणसं येतायत, मदत येत्येय याचं समाधान वाटत असेलही, थोडीशी धन्यताही वाटत असेल. पुण्याहून पत्रकार आले आहेत, एवढं कळताच त्यांचं हृदय भरून येत असे, स्वागताची धडपड करत असत. तरीदेखील मनात तीन-चार प्रश्न मुख्यत्वे येत—हा संघर्ष किती दिवस चालेल? किती बळी पडल्यावर थांबेल? असा संघर्ष सबंध केरळात होईल का? आमच्या काही विचारवंतांना वाटतं त्याप्रमाणे सबंध भारतात होईल का? आणि श्री. बाळासाहेब देवरस म्हणतात त्याप्रमाण संघ अशा प्रकारच्या झगड्यातून वाढणार आहे की काय? पण हे प्रश्न स्थानिक कार्यकर्त्यांना विचारण्याचे नव्हते. संघाच्या आणि इतर पक्षांच्या राज्यपातळीवरील नेत्यांना विचारायला हवे होते आणि ते आम्ही विचारलेही!!

त्याबद्दल पुढील अंकी.

**(क्रमशः)**

जे. एन्. पोंडा
फिनिक्स लायब्ररी, पुणे

# The Cycles of Heaven

(Cosmic Forces and What They Are Doing to You)
By Guy Lyon Playfair & Scott Hill
Souvenir Press
Pages 367, Rs. 83·66.

वरील पुस्तक मी पुष्कळ दिवसांपासून पुण्या–मुंबईच्या दुकानात बघत होतो. शेवटी ते मला श्री. दीक्षितांच्या इंटरनॅशनलमध्ये मिळाले. ही दीक्षितांकडील सर्व मंडळी म्हणजे कै. विठ्ठलरावांच्या पावलावर पाऊल ठेवून जाणारीच आहेत. एखाद्या पुस्तकाची आपण तेथे चौकशी केली व ते जर त्यावेळेला तेथे नसेल तर पुढच्या वळी तेथील श्री. पराडकर, श्री. मराठे वगैरे मंडळी ते पुस्तक आठवण ठेवून देतात. पुस्तकांच्या दुकानात वावरणारी माणसे जशी असावयास पाहिजेत तशीच माणसे तेथे आहेत. नाही तर आपल्या लष्करमधील एक मोठे दुकान पहा पुस्तकांचा व्यापार करण्याच्या उलाढालीत कदाचित या दुकानाचा पुण्यात पहिला नंबर असेल; परंतु तेथे एक मिशीवाला (आणि तेही वॉलरस-टाइप !) इतक्या आततायीपणाने वागायचा की, तेथे जाणेही जिवावर येई ! पुष्कळ लोकाना या मिशीवाल्याबद्दल बरा-वाईट अनुभव आला आहे. या मिशीवाल्याबद्दल एक गोष्ट मात्र सांगावी लागेल की, तो भलताच तत्पर होता. हजारो पुस्तकांतून तो अर्ध्या मिनिटात एखादे पाहिजे असलेले पुस्तक काढून द्यायचा. असो.

खूपच संशोधन करून हे पुस्तक लिहिले आहे. जन्मापासून मृत्यूपर्यंत माणसावर विश्वातून एक प्रकारचा भडिमार होत रहातो. आपल्याला वाटते तेवढे आपण स्वतंत्र नाही. उलट आपल्याला वाटते त्याहीपेक्षा अधिक आपण विश्वाच्या गूढ व अगम्य शक्तीच्या नियंत्रणाखाली आहोत असे हे लेखकद्वय म्हणतात. एवढ्या लांब सूर्यावर काय चालले आहे त्याचा असर आपल्यापर्यंत पोहोचतो. Solar Flares वाढले की, पृथ्वीवर मोटारींचे वगैरे अपघात जास्त होतात असे मी एकदा वाचले होते.

सूर्य व इतर ग्रहांमुळे हवामानात बदल होऊ शकतो. हा बदल झाल्यामुळे व Sun Spots मुळे हृदयात झटके येऊ शकतात, असे हे लेखक म्हणतात. नावाप्रमाणेच हे सूर्यावरील डाग असतात. लोहचुंबकाच्या प्रदेशामुळे हे डाग निर्माण होत असतात. या डागांच्या आतील उष्णतामान सूर्याच्या इतर भागांपेक्षा कमी असते. या डागांमधील फेरफार दर ११ वर्षांनी कमी-जास्त होत असतात. आपल्या पृथ्वीच्या आकाराइतका एक लहान सनस्पॉट सूर्यावर सहज असू शकतो. सबंध पृथ्वीएवढा ब्युटीस्पॉट आपल्या अंगावर मिरवणाऱ्या रवीराजाला नमस्कार! सूर्यातील मुख्य घटक म्हणजे हायड्रोजन व हेलियम. सूर्याच्या पृष्ठभागावरील उष्णतामान हे ६००० डिग्री सेंटिग्रेडइतके असते; परंतु सूर्याच्या गाभ्यात हे उष्णतामान १० ते २० दशलक्ष सेंटिग्रेडइतके असते. इतक्या प्रचंड उष्णतेमुळे हैड्रोजन व हेलियमचे मिश्रण होते व त्यातून अवाढव्य शक्ती निर्माण होते. काही महिन्यांपूर्वी जर्मनीच्या मॅक्स प्लँक संस्थेत सूर्याइतके कृत्रिम उष्णतामान तयार केले गेले होते.

सन स्पॉटस्‌मुळे पृथ्वीवरील हवामान बदलते व त्यामुळे धान्याचे भाव कमी-जास्त होतात, असे या पुस्तकात लिहिले आहे. इतकेच नव्हे तर कॉलरा, मॅनिनजायटिस, डीप्थेरिया हेसुद्धा सूर्यावरील बदलत्या परिस्थितीमुळे होत असतात.

सूर्यावर ज्या वेळेला जास्त उलथापालथ झाली होती त्या वेळेलाच दोन मोठे प्लेग झाले होते.

भूकंपाचा जेव्हा विषय निघतो तेव्हा एक चावून चोथा झालेला प्रदेश डोळ्यांसमोर उभा रहातो. तो म्हणजे कॅलिफोर्निया. चंद्राच्या गुरुत्वाकर्षणामुळे पृथ्वीवर भरती आणि ओहोटी येत असते. सूर्यमालेतील इतर ग्रहांच्या गुरुत्वाकर्षणामुळे पृथ्वीवर भूकंप होतात याची शक्यता नाकारता येणार नाही. अर्थात त्यासाठी पृथ्वीच्या भूपृष्ठावर faults असावे लागतात. कदाचित परग्रहावरचे गुरुत्वाकर्षण भूकंप निर्माण करणारे catalysing agent असतील. सन १९८२ ते १९८४ या दरम्यान आपली ग्रहमाला एका विचित्र अवस्थेतून जाणार आहे. याच सुमाराला कॅलिफोर्नियाचा बराच भाग पाण्याखाली जाईल असा या पुस्तकात दावा केला आहे. एडगर केसीनेसुद्धा कॅलिफोर्नियाविषयी असे भाकित केले; परंतु त्यांनी काळ मात्र वेगळा सांगितला आहे. सदर पुस्तकातील लेखकानी चक्क 'गुडबाय कॅलिफोर्निया' असे लिहिले आहे. कॅलिफोर्निया हे सर्वांत अधिक लोकसंख्या असलेले अमेरिकेतील एक राज्य आहे. पश्चिमेला ते पॅसिफिक महासागराजवळ आहे. या राज्याची राजधानी सेक्रामेन्टो ही आहे. त्याशिवाय लॉस एंजलीस, सॅन फ्रान्सिस्को व सॅन डिॲगो ही मोठमोठी शहरे या राज्यात आहेत. अमेरिकेत १८४९ साली मोठा 'गोल्डरश' झाला होता, तो याच राज्यात. या गोल्डरशमुळेच कॅलिफोर्नियाची लोकसंख्या प्रचंड वाढली. जाता जाता एवढे नमूद करावेसे वाटते की, हे पुस्तक सुव्हीनूर प्रेसने छापलेले आहे. हार्डकव्हरमध्ये. सुव्हिनूर प्रेस म्हणजे इंग्लंडमधील एक नावाजलेली संस्था. भविष्यात काय होईल हे नेमके सांगणे कोणत्याही माणसाला जवळजवळ अशक्यच. असल्या नामांकित प्रकाशकाने छापलेल्या पुस्तकात आतापासूनच कॅलिफोर्नियाला (१९८२ मध्ये) चक्क टाटा केले आहे हे थोडेसे नाही परंतु पुष्कळसे बालीश वाटते ! कॅलिफोर्नियातील पुष्कळ लोकांना ही भाकीते माहिती आहेत. तरीसुद्धा केवळ ४% लोकांनी भूकंपाचा विमा उतरवला आहे. अर्थात् काही लोकांची स्वप्ने व भाकिते खरी ठरली आहेत. असे होणारच नाही असे उपहासाने म्हणणे आपण टाळले पाहिजे; परंतु बऱ्याच वेळा असे होते की; बंद पडलेले घड्याळ दोन वेळा अचूक वेळ दाखवते. म्हणजे काही भाकित केवळ योगायोगानेच खरी ठरतात हेही तितकेच खरे !

सोलर फ्लेअर्स या बहुतेक सूर्यावरील डागातच निर्माण होत असतात; परंतु त्या कमी वेळ टिकतात. या flares मधून एक्सरे व इतर कण निघतात. त्यांच्यामुळे पृथ्वीवरील लोहचुंबक व ध्वनीलहरी यांच्या

क्षेत्रात दोष निर्माण होतात. अगदी अलीकडे लोहचुंबक पद्धतीने पुष्कळ रोग बरे करण्यात येत आहेत यावरून Sun Spots व Solar flares हे मानवी शरीरात वा पर्यायाने मानवी मनात किती बदल घडवून आणू शकतात हे स्पष्ट दिसते.

या पुस्तकास डॉ. हार्वालिकबद्दल असे लिहिले आहे की, त्यांना कोणत्याही वायर-शिवाय २० फुटापर्यंत मानवी हृदयाचे ठोके व मेंदूच्या लहरी 'कळू' शकतात. भय किंवा सेक्सबद्दलचे विचार सर्वांत अधिक लोहचुंबकमय लहरी निर्माण करतात. (स्त्रियांना अती कामुक पुरुष सहज ओळखू येतो ते यामुळे तर नसेल ना?)

रेडिओच्या लहरी (वेव्हज्) माणसाच्या कातडीत जातात तेव्हा काय होते? १९७४ मधे डॉ. ॲन्ड्रिजा पुहारिकने या विषयावर एक लेखच लिहिला होता. डॉ. पुहारिक यांनी पुष्कळ शोध लावले आहेत. त्यांनी वेगवेगळ्या संशोधनांच्या ५० पेटंटस् मिळवल्या आहेत. त्यातली एक (TD-100 Transdermal Instrument) अशी आहे की, जर बहिऱ्या माणसाच्या हाताला एक तबकडी लावून त्या तबकडीतून रेडिओ लहरी सोडल्या तर त्या माणसाच्या मेंदूपर्यंत nerve impulse जाऊन त्याला ऐकायला जाते.

जोनाथान स्वीफ्टने १७२६ मधे 'गलिव्हर्स ट्रॅव्हल्स' लिहिले तेव्हा त्याने Mars च्या फोबोस व डीमोस या दोन चंद्रांचा अगदी बारकाव्याने उल्लेख केला होता. खरे तर आसफ हॉल नावाच्या एका माणसाला या दोन चंद्रांचा १५० वर्षांनंतर थांगपत्ता लागला. जोनाथन स्वीफ्टला अतींद्रीय शक्ती लाभली होती त्याचा हा पुरावाच. जोनाथान स्वीफ्टने 'Battle of Books' 'Tale of a Tub' व इतर राजकीय, धार्मिक व नैतिक पुस्तके लिहिली आहेत. ही पुस्तके त्या वेळच्या परिस्थितीवर होती. बहुतांशी ती उपहासात्मक होती. त्याची लेखणी अगदी हालाहल होती. त्यामुळे डॉ. जॉन्सन, मेकॉले व थॅकरे या प्रसिद्ध लेखकांनी त्याला वाळीत टाकले होते.

या पुस्तकाचा काही भाग बालीश वाटतो तर काही भाग विज्ञानाचा आधार घेऊन लिहिला असे वाटते. एकूण पुस्तक चांगलेच वाचनीय आहे. □

चित्रपट । सदानंद बोरसे

# २२ जून १८९७

## वस्तुनिष्ठ इतिहास

'फार फार वर्षं झाली त्या गोष्टीला' अशी सुरुवात ज्या तारखेसाठी काळाच्या कोष्टकावर शोभून दिसेल अशी तारीख. पण तरीही या 'फार वर्षां'मध्ये दंतकथन नाही याचे स्पष्ट प्रमाण देणारी इतिहासाच्या कोष्टकावर उठून दिसेल अशी तारीख. आजच्या पिढीला कदाचित संदर्भ आठवणार नाही; पण एखाद्या अतिशय प्राचीन वृद्धाच्या स्मृतींच्या ढलप्या पाडल्या, आठवणींची सालं खरवडली; तर कदाचित अजूनही रक्तवर्णाने डागाळलेली दिसेल अशी तारीख. अचानक कोणी विचारले, 'काय घडलं या तारखेला?' तर उत्तर मिळणे कठीणच; पण चापेकर, रँड, गणेश-खिंड असे काही मोजके परवल उच्चारले, तर ज्या तारखेची गुहा तिच्यावरील तिळा बाजूला सरकून पिस्तुलाच्या आवाजाने दुमदुमेल अशी तारीख २२ जून १८९७.

या तारखेला घडलेला रँडचा खून, त्या खुनामागची पार्श्वभूमी, झालेला कट आणि या खुनानंतर खून आणि फासांच्या सत्राने मृत्यूच्या सावटाखाली झाकाळलेले पुढचे बारा महिने रंगविणारा '२२ जून १८९७' हा चित्रपट. या महत्त्वाकांक्षी चित्रपटाचे दिग्दर्शक आहेत नचिकेत आणि जयू पटवर्धन, 'रक्त पुष्प' ही छोटीशी गोष्ट नचिकेतला वाचायला मिळाली. त्या गोष्टीने भारावून जाऊन त्याने या चित्रपटाचा संकल्प सोडला. खरे तर, सध्याच्या काळात अशा ऐतिहासिक गोष्टीला चित्रपटासाठी हात घालणे म्हणजे धंद्याच्या दृष्टीने धाडस नव्हे. तर शुद्ध वेडेपणाच. पण ज्या ठिकाणी धंद्याचा, त्यातून मिळणाऱ्या नफ्याचा रोकडा प्रश्न अन् अपेक्षित ठोक उत्तर नसते, त्या ठिकाणी अशी बंधने येतच नाहीत. म्हणूनच दोघांनी धडाक्याने काम सुरू केले. एक मोठी टीम गोळा करणे सुरू झाले. या टीमचे वैशिष्टय म्हणजे सगळी मंडळी तरुण होती, चित्रपट क्षेत्रात अननुभवी होती; पण उत्साही होती, चिवट होती, जिद्दी होती आणि मुख्य म्हणजे काही तरी नवे करण्यासाठी धडपडणारी होती. एकीकडे नचिकेत आणि शंकर नाग चित्रपटासाठी पटकथा तयार करीत होते; एकीकडे जयू एखाद्या नाटकातून, एखाद्या कार्यक्रमातून चित्रपटातील व्यक्तिरेखांना साजून दिसतील असे चेहरे शोधण्यात गर्क होती, एखाद्याची निवड झाली की, भराभर त्याची वेगवेगळ्या कोनांतील छायाचित्रे घेऊन, आवश्यक ते पोषाख शिवण्यासाठी मापे घेऊन त्याला आवश्यक त्या सूचना देत होती. चंद्रकांत काळे, हेमा लेले, सुजल वाटवे इत्यादींच्या स्वरांना आनंद मोडकच्या सुरावटीत बांधून चित्रपटातील गीते जन्म घेत होती. स्थळांची निवड, आवश्यक त्या परवानग्या, सामान इत्यादी लाखो भानगडी निस्तरण्यासाठी प्रयत्न चालू होते.

अखेर बरीचशी जमवाजमव होऊन चित्रीकरणाला प्रारंभ झाला आणि पस्तीस दिवसांत दि. १८ एप्रिलला चित्रीकरण पूर्ण-सुद्धा झाले. पुण्याला विद्यापीठ, येरवडा जेल आणि अन्य काही वाड्यांमध्ये, तर बरेच चित्रीकरण वाईलाही झाले.

चित्रपटाच्या अन्य तपशिलांबाबत एका दमात सांगून टाकायचे, तर संकलक–जेठू मंशल, छाया चित्रकार–नवरोझ कॉंट्रॅक्टर, ध्वनिसंयोजक–विनय श्रीवास्तव, संवाद–विजय तेंडुलकर आणि कलाकर–प्रभाकर पाटणकर, रवींद्र मंकणी, उदयन दीक्षित, रॉड्रिक गिल्बर्ट, जॉन आयर्विंग, सदानंद बोरसे, श्रीकांत गद्रे, सदाशिव अमरापूरकर, जयराम हर्डीकर, वासुदेव पाळंदे, सतीश खरे, सुजल वाटवे, शांता जोग, अरुंधती राव आणि इतर किती तरी. चित्रपट पूर्ण लांबीचा, मराठी (आणि तरीही) सप्तरंगात आहे. चित्रपटाला फिल्म फायनान्स कॉर्पोरेशनचे आर्थिक साहाय्य लाभले आहे.

तर असा हा ऐंशी वर्षांपूर्वीचा इतिहास वस्तुनिष्ठपणे चित्रित करणारा चित्रपट सप्टेंबर अथवा ऑक्टोबरमध्ये प्रदर्शित होईल. विषयाच्या वेगळेपणामुळे आता तरी या तरुण मंडळींकडून उमेद बाळगायला हरकत नाही.

□

# हिंदुस्थान अँटिबायोटिक्स, पिंपरी : खुलासा : पृष्ठ ८ वरून

वश्यक होते. नवीन उभारावयाच्या प्लांट्सची कामे डिझाइन इंजनियरिंग फर्म्सना देण्यात आली आणि प्रोजेक्टस् डिव्हिजनमधून विविध विषयातील स्थापत्य तज्ञ तयार करण्याचे काम सुरू झाले आहे. सहाव्या पंचवार्षिक योजनेत या कारखान्यात सुमारे १२२ कोटी रुपयांच्या विस्तार योजना अपेक्षित आहेत. त्यासाठी आतापासून पूर्वतयारी करणे जरूर आहे.

० सर्व क्षेत्रात अद्ययावत व जागतेपणाची जाणीव जागत ठेवणे जरूर आहे. त्यास अनुसरून सर्व स्तरातील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देत राहणे हे न संपणारे कार्य आहे. त्यासाठी इंडस्ट्रियल इंजिनियरिंग विभाग नव्याने उघडण्यात आला. त्यामार्फत मोठ्या प्रमाणात शिक्षण योजना सुरू झाल्या. केवळ गेल्या एका वर्षात सुमारे एक हजार विविध स्तरातील कर्मचाऱ्यांना विविध क्षेत्रातील कामाबद्दल खास तज्ज्ञांचेकडून मार्गदर्शन लाभले ही बाब लक्षणीय नाही का? कॉर्पोरेट लाँग रेंज प्लानिंगचेसुद्धा शिक्षण. या कार्यक्रमाद्वारे देण्यात आले. मजदूर सुपरवायझर, मेडिकल रिप्रेझेंटेटिव्हज्, व्यवस्थापकीय स्तरावरील अधिकारी, हिशेब तपासनीस इत्यादी विविध क्षेत्रातील कर्मचाऱ्यांचेसाठी शिक्षणक्रम आयोजित करण्यात आले होते. बी. एस्. सी. व एस्. एस्. सी. शिक्षण झालेल्या मॅनेजमेंट ट्रेनीजची निवड करण्यात आली व त्यांना कंपनीच्या विविध क्षेत्रातील विस्तारित कार्यासाठी तयार करण्यात येत आहे.

आपल्या साप्ताहिकाचे अंकात आपण जो विस्तृत लेख लिहिला त्यातील आक्षेपावर प्रकाशझोत टाकून सत्य परिस्थिती व निवेदन करण्याचा प्रयत्न या लेखात केला आहे. एवढ्या प्रचंड कार्यात कोठे उणेदुणे राहणे शक्य आहे, नाही असे नाही. परंतु अशा टीकेमुळे सुधारणा होऊ शकत असेल तर उत्तम. राष्ट्रीय आरोग्य समस्या व औषधांची बेसुमार आयात या समस्यांना तोंड देण्यासाठी आता हा प्रकल्प निश्चयाने उभा आहे त्या कार्याचे स्वरूप आपल्या सुज्ञ वाचकांना करून देण्यासाठी, येथील कामगारांचे नैतिक बळ वाढविण्यासाठी आपण आम्हास सहाय्य कराल अशी आमची खात्री आहे.

सहाय्यक जनता संपर्क अधिकारी,
हिंदुस्थान अँटिबायोटिक्स, पिंपरी

[ मूळ लेखापेक्षा खुलासा मोठा आहे, तरी तो किरकोळ काटछाट करून समग्र छापला आहे. हेतू हा, की एका राष्ट्रीकृत उद्योगाची साधकबाधक चर्चा व्हावी. दुर्दैवाने खुलासा पाठविताना हिंदुस्थान अँटिबायोटिक्सच्या संबंधित अधिकाऱ्यांनी साधकबाधक व मोकळी चर्चा हा दृष्टिकोन न बाळगता समर्थनाचा दृष्टिकोन बाळगून आपला लेख तयार केलेला दिसतो. यातील अनेक मुद्यांना उत्तरे देणे, समर्थनातील पोकळपणा दाखवून देणे शक्य आहे; पण त्यासाठी मूळ लेख, खुलासा यापेक्षाही आणखी मोठा लेख लिहावा लागेल व अंकातील इतर विषयांवर हे भयंकरच आक्रमण ठरेल. उदाहरणार्थ-

पेनिसिलीन व स्ट्रेप्टोमायसिनच्या उत्पादनाचा उच्चांक झाला असे व्यवस्थापकांचे म्हणणे आहे; परंतु ग्लॅक्सोकडून स्ट्रेप्टोमायसिनचा अडीचपट क्षमतेचा स्ट्रेन मिळाल्यानंतर पूर्वीइतकेच फर्मेंटर वापरून उत्पादनक्षमता अदमासे अडीचपट वाढल्याचे ते गुप्त ठेवू इच्छितात. त्याचप्रमाणे 'टोयो जोझो' या जपानी कंपनीकडून तीन पट क्षमतेचा स्ट्रेन मिळाल्यानंतर, सध्या उभारलेल्या यंत्रसामुग्रीच्याच साहाय्याने उत्पादनक्षमता तीन पटींनी वाढली हे ते कबूल करीत नाहीत.

तसेच 'Semi Synthetic Penicillins Plant'-(म्हणजे 6 APA उत्पादन करून त्यापासून अँपिसिलिन निर्माण करण्याचे प्लँट) दोन वर्षांपूर्वी अधिकृतरीत्या चालू झाले होते. सध्या ते बंद आहे. मधल्या काळात त्या प्लँटमध्ये मग खोटेखोटेच काम चालू होते की काय? 'व्हिटॅमिन सी' प्लँट, ऑगस्ट १९७८ मध्ये चालू होईल असा दिलासा गेल्या (१९७७-७८) वार्षिक अहवालात दिला आहे. ते प्लँट चालू झाले, की अजूनही चालू झालेले नाही, याचा खुलासा व्यवस्थापकांनी का टाळला?

यंदाच्या वर्षी ट्रेड सेल्स वाढले हे खरे. अनेक ठिकाणी नवे डेपो उघडले व नव्या नेमणुका केल्या. १९ सेल्स रिप्रेझेंटेटिव्हची संख्या ७४ वर गेली. सेल्स ८० लाखावरून १८० लाखांवर गेले. अगदी साधे गणित समजणाऱ्या कोणालाही विचारा की, हे कार्यक्षमता वाढल्याचे लक्षण आहे की कमी झाल्याचे?

दोन जनरल मॅनेजर्सना गाडी, पेट्रोल व ड्रायव्हर सशुल्क देतात ना? पूर्वी ही प्रथा होती का? कंपनी आर्थिक अडचणीत असताना ही प्रथा का चालू केली?

अशी यादी आणखीही वाढवता येईल; पण व्यवस्थापकांचा दृष्टिकोन केवळ समर्थनाचा, आपलीच सर्व बाजू बरोबर आहे हे पटवण्याचा राहणार असेल तर, या वादावादीतून निष्पन्न काय होणार?

सर्व अलबेल असतानाही मुख्य संचालक राजीनामा देण्याच्या तयारीत असल्याच्या वार्ता पसराव्यात हेही एक नवलच म्हटले पाहिजे!

तरी पण मूळ लेखाची इतकी काळजीपूर्वक दखल घेतल्याबद्दल व्यवस्थापकांचे आभार मानले पाहिजेत.

ही चर्चा सध्या तरी येथे थांबवली आहे. -संपादक ]

## क्षमस्व !

अचानक कोसळलेल्या वीज संकटामुळे हा अंक वेळेवर निघू शकला नाही. चार पाने कमी करावी लागल्याने नेहमीची रंगभूमी, परराष्ट्र घडामोडी ही सदरे देता आली नाहीत. ठरल्याप्रमाणे वीज मिळून छापखान्याचे काम सुरळीत चालू झाले तर पुढील आठवड्याचा अंक नेहमीप्रमाणे वेळेवर निघेलच. यात काही व्यत्यय आल्यास थोडे मागेपुढे होईल. वाचकांनी गैरसमज करून घेऊ नये ही विनंती. विक्रेत्यांनीही याची कृपया नोंद घ्यावी.

—व्यवस्थापक 'माणूस'